



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १६५ * नांदेड * सोमवार, दि. २२ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात काम करणार, खा. ओमराजेंची घोषणा



**धाराशिव (प्रतिनिधी)** – मागील काही दिवसांपासून सुरु असलेल्या ऑपरेशन टायगरच्या चर्चेला रविवारी मूर्त स्वरूप मिळाले. उद्धवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी रविवारी सायंकाळी मतदारसंघातील कार्यकर्त्यांशी संवाद साधून शिंदेसेनेत जाण्याचा त्यांचा निर्णय जाहीर केला.

सध्या राज्याच्या मोठ्या राजकीय घडामोडीच्या केंद्रस्थानी राहिलेले उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाचे खा. ओमराजे निंबाळकर हे रविवारी दुपारी ४ वाजता त्यांच्या गोवर्धनवाडी येथील निवासस्थानी पोहोचले. वडील स्व. पवनराजे यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी ५ वाजेपासून बैठकीला सुरुवात केली. मतदारसंघातील औसा, उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद, बार्शी, परंडा या सहाही विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांशी टप्प्याटप्प्याने इनडोअर चर्चा केली. विद्यमान स्थिती व कार्यकर्त्यांचा आग्रह लक्षात घेत त्यांनी रात्री आपला निर्णय जाहीर केला. कार्यकर्त्यांसाठी आपण शिंदेसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेत असल्याचे जाहीर केले.

कार्यकर्त्यांना खा. ओमराजे यांनी सुरुवातीलाच स्थानिक स्वराज्य संस्थेतील पराभवाचा दाखला दिला. केवळ मी निवडून येणे महत्वाचे नाही तर, तुम्ही कार्यकर्त्यांनीही निवडून येणे माझ्यासाठी महत्वाचे आहे. तुमची कामे होणे महत्वाचे आहे. यासाठी आपण पक्षांतराचा निर्णय घेत असल्याचे सांगितले. या निर्णयाला कोणीही विरोध दर्शवला नाही.

## हिंमत असेल तर राजीनामा द्या – खा. राऊत

मराठी माणसांशी बेईमानी करणाऱ्यांना, दिसेल तिथे आणि हातात जे असेल त्याने हाणा, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यानी फुटलेल्या खासदारांना इशारा दिला. शिवसेनेने रक्ताचं पाणी केलं, तुम्हाला गटारातून गंगेत नेल्याचे राऊत म्हणाले. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईमुळे तुम्ही आमदार, खासदार झालात, असे राऊत म्हणाले. तुम्ही मशालीच्या चिन्हावर निवडून आले आहेत. मशालीची मते ही उद्धव ठाकरेंच्या ओरीजनल शिवसेनेला पडली आहेत. ती मतं भाजपच्या आणि मिंधेच्या विरोधात पडली आहेत. तुम्ही लाखो मतदारांचा अपमान व बेईमानी केली आहे. तुम्ही राजीनामा द्या आणि जिकडे जायचं तिकडं जा, असे राऊत म्हणाले. हिंमत असेल तर पुन्हा उभा राहा आणि जिंकून दाखवा, शिवसैनिक तुम्हाला आडवं करुन दाखवल्याशिवाय राहणार नाही, असे राऊत म्हणाले.

# आजपासून विधीमंडळाचे अधिवेशन : महायुती सरकारच्या चहापानावर महाविकास आघाडीचा जाहीर बहिष्कार



**मुंबई (प्रतिनिधी)** – आजपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनापूर्वीच महाराष्ट्राच्या राजकारणात ठिणगी पडली आहे. विरोधकांना फोडण्यात व्यस्त असलेल्या महायुती सरकारला आरसा दाखवत महाविकास आघाडीने मुख्यमंत्र्यांच्या शासकीय चहापानाच्या निमंत्रणावर जाहीर 'बहिष्कार' टाकला आहे.

उद्यापासून (२२ जून) सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनापूर्वीच महाराष्ट्राच्या राजकारणात ठिणगी पडली आहे. विरोधकांना फोडण्यात व्यस्त असलेल्या महायुती सरकारला आरसा दाखवत महाविकास आघाडीने मुख्यमंत्र्यांच्या शासकीय चहापानाच्या निमंत्रणावर जाहीर 'बहिष्कार' टाकला आहे. राज्यात दुष्काळाचे भीषण सावट, शेतकऱ्यांची फसवी कर्जमाफी, कायदा-सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा आणि 'नीट' पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान... अशा अनेक ज्वलंत प्रश्नांकडे डोळेझाक करणाऱ्या सरकारसोबत चहा पिणे आम्हाला मुळीच मान्य नाही, असा घणाघात करत महाविकास आघाडीने विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनपूर्व शासकीय चहापान कार्यक्रमावर अधिकृत बहिष्कार टाकला आहे. विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ६ पानांचे खरमरीत पत्र पाठवून सरकारच्या 'निष्क्रिय आणि असंवेदनशील' कारभारावर १३ गंभीर मुद्द्यांच्या आधारे तीव्र हल्लाबोल केला आहे. हे पत्र जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सतेज पाटील, अनिल परब, अंबादास दानव, अमीन पटेल या आमदारांनी लिहलं आहे.

महाविकास आघाडीच्या आमदारांनी हे पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लिहलं आहे, यामध्ये महत्त्वाच्या १३ गोष्टी मांडल्या आहेत.

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ पासून मुंबई येथे सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आपण आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमाचे निमंत्रण विरोधी पक्षाला प्राप्त झाले, त्याबद्दल धन्यवाद. राज्यातील विद्यमान परिस्थितीचा सर्वंकष व वास्तववादी आढावा घेतला असता, राज्यावर दुष्काळाचे सावट, भीषण पाणी टंचाई, शेतकऱ्यांना फसवी कर्जमाफी, शेतकरी आत्महत्येत वाढ, ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, इंधन तुटवडा, महागाई, नीट पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांवर अन्याय, जनतेच्या या तीव्र रोषाकडे पूर्णपणे डोळेझाक करून केवळ औपचारिक चहापानाचा कार्यक्रम आयोजित करणे विरोधी पक्षाला मुळीच मान्य नाही.

राज्यात पाऊस लांबल्यामुळे दुष्काळाची परिस्थीती निर्माण झाली असून शासनाचे पाण्याचे नियोजन चुकलेले आहे. राज्यातील धरणात आज फक्त २३.५४ टक्के पाणी साठा शिल्लक आहे.

# इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय एकदिवसीय संघाची घोषणा

### शुभमन गिल कर्णधार, विराट आणि रोहित दोघेही संघात; श्रेयसला उपकर्णधारपद

**मुंबई (प्रतिनिधी)** – भारतीय क्रिकेट नियंत्रण मंडळाने रविवारी इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय एकदिवसीय संघाची घोषणा केली. संघाची धुरा शुभमन गिलकडे सोपवण्यात आली आहे, तर अनुभवी फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा हे देखील संघात आहेत. श्रेयस अय्यरला उपकर्णधार बनवण्यात आले आहे.

आगामी मालिका २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. टी-२० संघाची घोषणा आधीच झाली आहे. भारतीय संघाचा इंग्लंड दौरा १ जुलैपासून सुरू होईल. प्रथम ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाईल. तर तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १४ जुलैपासून खेळली जाईल.

**इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय एकदिवसीय संघ**

शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), ईशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नीतीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर बरार.

# गोदावरी पात्रात बुडून माय-लेकाचा मृत्यू; काळेश्वर येथील दुर्दैवी घटना

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील काळेश्वर घाट येथील गोदावरी नदीच्या पात्रात पाय घसरून पडल्याने माय- लेकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना रविवारी सकाळी उघडकीस आली आहे. संगवाबाई कळसकर (वय अंदाजे ५५ वर्ष) आणि त्यांचा मुलगा शुभम राघोळु कळसकर (वय अंदाजे ३० वर्ष, दोघे रा. दत्तनगर, नांदेड) अशी या मृत माय-लेकांची नावे आहेत. या घटनेमुळे दत्तनगर परिसरासह संपूर्ण शहरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

शिवपुराण कथा ऐकण्यासाठी काळेश्वरला आल्याची प्राथमिक माहिती आहे. नांदेड शहरातील दत्तनगर भागात राहणारे संगवाबाई कळसकर आणि त्यांचा मुलगा शुभम हे दोघे रविवारी सकाळी काळेश्वर मंदिरामध्ये सुरू असलेली शिवपुराण कथा ऐकण्यासाठी आले होते. कथा सुरू होण्यापूर्वी दोघेही हातपाय धुण्याच्या उद्देशाने काळेश्वर घाटावरील गोदावरी नदीच्या पात्रात उतरले. मात्र, याच वेळी पाण्याचा अंदाज न आल्याने किंवा काठावरील निसरड्या जागेमुळे दोघांचाही पाय घसरला आणि ते खोल पाण्यात बुडाले.

रविवारी सकाळी काळेश्वर घाटावरील गोदावरी नदीच्या पाण्याच्या प्रवाहावर एक महिला आणि एका पुरुषाचा मृतदेह तरंगताना नागरिकांना मिळून आला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जीव रक्षक दलाच्या मदतीने तातडीने दोन्ही मृतदेह पाण्याबाहेर काढले. त्यानंतर तपासचक्र फिरवून मयतांची ओळख पटवली असता, ते दत्तनगर येथील माय-लेक असल्याचे निष्पन्न झाले.

घटनेची माहिती मयतांच्या नातेवाईकांना देण्यात आली असून, नातेवाईकांनी घटनास्थळी व रुग्णालयात धाव घेतली. दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत. एकाच वेळी माय-लेकाचा असा दुर्दैवी अंत झाल्याने कळसकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# उन्हाच्या तीव्रतेमुळे शाळेच्या वेळेत बदल -जिल्हाधिकारी

**नांदेड (प्रतिनिधी)**– यंदा जून महिन्याचा शेवटचा आठवडा आला असून अद्याप आवश्यक तेवढा पाऊस पडला नाही तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्वच भागात उन्हाची तीव्रता अधिक असल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील तरतुदीनुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या इयत्ता पहिली ते बारावीच्या शाळा कॉलेज सकाळच्या सत्रात म्हणजे सकाळी ८ ते दुपारी १२.३० या वेळेत सोमवार २२ जून सोमवारपासून भरविण्यात येणार आहेत असे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कळविले आहे.

त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या आणि सर्व माध्यमाच्या मराठी, इंग्रजी, उर्दू राज्य मंडळ सीबीएससी व इतर मंडळाच्या सर्व शाळा व्यवस्थापन यांनी याची नोंद घेऊन २२ जून सोमवारपासून पुढील आदेशापर्यंत इयत्ता पहिली ते बारावीच्या शाळेचे वर्ग सकाळी आठ ते साडेबारा यावेळेत भरविण्यात यावेत असे शिक्षण विभागातर्फे सांगण्यात आले आहे.

# निवृत्त अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. आर. टी. राठोड यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्याचे माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. रामचंद्र थावरा राठोड यांचे, रविवार, दि. २१ जून रोजी दीर्घ आजाराने मुंबई येथे निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर त्यांचे मूळ गाव डौर (ता. अर्धापूर) येथे दि. २२ जून सोमवारी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. डॉ. रामचंद्र राठोड यांनी महाराष्ट्र पोलीस दलात प्रदीर्घ सेवा बजावत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, सामाजिक सलोखा जपणे आणि जनतेच्या सुरक्षिततेसाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कर्तव्यनिष्ठ, शिस्तप्रिय व लोकाभिमुख अधिकारी म्हणून स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. पोलीस सेवेसोबतच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अमेरिकेतील एका संस्थेने त्यांना 'डी.लिट.' ही मानद पदवी प्रदान करून सन्मानित केले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन मुले, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मुंबई येथील केईएम रुग्णालयातील रेडिओलॉजी विभागाचे प्राध्यापक डॉ. क्रांतिकुमार राठोड तसेच डौरचे माजी सरपंच डॉ. मनोजकुमार राठोड यांचे ते वडील होत. डॉ. रामचंद्र राठोड यांच्या निधनाने एक कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, सामाजिक भान असलेला व्यक्तिमत्त्व आणि जनतेच्या सुरक्षेसाठी आयुष्य वेचलेला अधिकारी हरपल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

# खडकपुरा भागात झालेल्या खुनातील पाच आरोपी चार तासांतच पोलिसांच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)**– दर्ग्याच्या जागेवरून रविवारी पहाटे दोनच्या सुमारास खडकपुरा परिसरातील वाघी रस्त्यावर एकावर फायरिंग करून नंतर तलवारीने व खंजरने सपासप वार करून खून करणाऱ्या पाच आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा आणि वजिराबाद पोलिसांनी अवघ्या चार तासात जेरबंद केले. या पाचही आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. या पथकाचे पोलीस अधीक्षकांनी कौतुक केले आहे.

आरोपीतांची नावे निष्पन्न करण्यासाठी एकूण ६२ ठिकाणांवरील CCTV फुटेज तपासण्यात आले. तसेच संशयीत हजारो मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. या सर्व प्रयत्नांमुळे गुन्ह्यामध्ये प्रत्यक्ष सहभागी असणारे सर्व आरोपी अनोळखी असून देखील अवघ्या काही तासात आरोपीतांचे नाव व त्याचा ठाव ठिकाणा शोधून त्यांना ताब्यात घेण्यात यश आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी हे महादेव पिंपळगाव ता. अर्धापूर शिवारात असल्याची खात्रीशिर गोपनीय माहिती मिळाल्याने वरिष्ठांच्या आदेशाने सदर ठिकाणी तत्काळ रवाना होवुन मिळालेल्या माहितीचे ठिकाणी सापळा लावून आरोपी मिर्झा शब्बीर बेग गफार बेग (वय ३९ वर्ष, रा. खडकपुरा, नांदेड), ऋषीकेश अनिल घुले (वय २३ वर्ष, शंकर नगर तरोडा खुर्द नांदेड), सय्यद सुफीयान सय्यद जमीर (वय १९ वर्ष, रा. देगलुर नाका, नांदेड), माधव भगवान कांबळे (वय २१ वर्ष, रा. राहुल कॉलनी, तरोडा बु.नांदेड), मुस्ताक अहेमद इसाक अहेमद (वय २१ वर्ष रा. आसरानगर, नांदेड) यांना ताब्यात घेवुन गुन्ह्यासंबंधाने सखोल विचारपूस केली असता आरोपीतांनी सदरचा गुन्हा त्यांचे इतर साथीदारांसह मिळून केल्याची कबुली दिली. नमूद आरोपीतांना ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर कारवाई कामी वजिराबाद पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# दुल्लेशहा मस्जिदचे नायब मुतवली शेख शमीम यांची गोळ्या झाडून हत्या




**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील खडकपुरा वाजी रस्त्यावर एका ४० वर्षीय व्यक्तीची पूर्ववैमनस्यातून निघृण हत्या करण्यात आली आहे. हजरत शाह रहेमान दर्गा आणि दुल्हेशाह मस्जिदचे नायब मुतवल्ली शेख शमीम शेख इसाक यांची हत्या करण्यात आली असून, या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

ही घटना रविवार दि.२१ जून रोजी पहाटे २ ते २:१० च्या सुमारास बरकतपुरा वाघी रोडवरील अबरार फंक्शन हॉल समोर घडली. मयत शमीम हे त्यांचे मित्र शिवशंकर पवार यांच्यासोबत गप्पा मारत बसले असताना, दोन दुचाकींवरून आलेल्या चार अज्ञात हल्खोरांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. हल्लेखोरांनी प्रथम शमीम यांच्यावर पिस्तूलने गोळी झाडली आणि त्यानंतर तलवार व खंजीरने त्यांच्या पोटावर व डोक्यावर सपासप वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

गंभीर जखमी झालेल्या शमीम यांना तातडीने यशोसाई रुग्णालयात हलवण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान सकाळी ५ वाजता त्यांचा मृत्यू झाला.

वसीम शेख इसाक यांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्गा आणि मशिदीच्या व्यवस्थापनावरून आरोपींशी त्यांचा जुना वाद होता. सन २०२३ मध्ये आरोपींविरुद्ध दाखल केलेला गुन्हा मागे घेण्यासाठी आणि दर्याचे नायब मुतवल्ली पद सोडण्यासाठी शमीम यांना वारंवार जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या.वजिराबाद पोलिसांनी या प्रकरणी मिर्झा बेग, मिर्झा कलंदर बेग, मिर्झा शब्बीर बेग आणि दोन अनोळखी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे घटनास्थळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व त्यांची टीम तसेच वजिराबाद ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी भेट देऊन पाहणी केली. मारेकऱ्यांना पकडण्यासाठी पोलिसांचे पथक वेगवेगळ्या दिशेने रवाना करण्यात आले आहेत.




# भारतीय महिला हॉकी संघाला नेशन्स कपचे विजेतेपद

**ऑकलंड (वृत्तसंस्था)** – भारतीय महिला हॉकी संघाने एफआयएच हॉकी नेशन्स कप २०२६ जिंकला आहे. अंतिम सामन्यात भारताने यजमान न्यूझीलंडचा २-० असा पराभव करून एक मोठा विजय नोंदवला. ऑकलंडमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारतीय हॉकीपटूंनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला आणि प्रतिस्पर्धी संघाला पुनरागमन करण्याची कोणतीही संधी दिली नाही. न्यूझीलंड भारताच्या आव्हानासमोर टिकूच शकले नाही.

जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेल्या भारताने १० व्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडला हरवले. या सामन्यात नवनीत कौर (चौथ्या मिनिटाला) आणि सुनीलिता टोप्पो (१५ व्या मिनिटाला) यांनी गोल करून भारताला विजेतेपद मिळवून दिले.अंतिम सामन्यात लालरेम्सियामी हमारजोतेला 'प्लेअर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला, तर दीपिकाने सहा गोल करून अमेरिकेच्या श्ले सेसासोबत संयुक्तपणे सर्वाधिक गोल करण्याचा मान मिळवला.भारताचे हे दुसरे एफआयएच नेशन्स कप विजेतेपद आहे. भारताने यापूर्वी २०२२ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती.

अनुभवी स्ट्रायकर नवनीत कौरने सामन्यातील पहिला पेनल्टी कॉर्नर गोलमध्ये रूपांतरित करून पहिल्या पाच मिनिटांतच भारताला आघाडी मिळवून दिली.सुरुवातीला आघाडी घेतल्यानंतर, भारतीय महिला हॉकी संघाने उत्कृष्ट कामगिरी केली आणि पहिल्या क्वार्टरमध्ये आणखी चार पेनल्टी कॉर्नर मिळवले, त्यापैकी शेवटचा त्यांचा पहिला पेनल्टी कॉर्नर होता.

# वैभव सूर्यवंशीने दाखवले श्रीलंकन खेळाडुंना भरदिवसा तारे

**कोलंबो (वृत्तसंस्थ)** – तिंरगा मालिकेच्या अंतिम सामन्यात इंडिया ए संघाचा वैभव सूर्यवंशीने श्रीलंका ए विरुद्धच्या सामन्याला केवळ अंतिम सामना न ठेवता बदल्याचा सामना बनवला. वैभवची बॅट अशी काही तळपली की, श्रीलंकन खेळाडू यापुढे हा काय खझङ नाही! असे म्हणायला शंभर वेळा विचार करतील. वैभवने अवघ्या २९ चेंडूंमध्ये श्रीलंकन गोलंदाजांना दिवसा तारे दाखवले.

श्रीलंकन गोलंदाजांची धुलाई करत वैभवने केवळ जागतिक विक्रमच मोडीत काढला नाही, तर मालिकेत सर्वाधिक षटकार ठोकून आपला शानदार प्रवास संपवला. तिंरगा मालिकेत यापूर्वी श्रीलंका ए विरुद्ध खेळलेल्या दोन सामन्यांत वैभवची कामगिरी फारशी विशेष झाली नव्हती. त्या दोन डावांत त्याला ३५ धावा करता आल्या होत्या. दरम्यान, एका सामन्यात सुपर ओव्हरमध्ये वैभव क्रीझवर होता. जेव्हा तो सामना जिंकवून देऊ शकला नाही, तेव्हा श्रीलंकन खेळाडूंनी त्याच्यावर टोमणा मारत मोठ्या मिजाशीत म्हटले होते.

श्रीलंकन खेळाडूंच्या या वक्तव्यानंतर वैभव आणि त्यांच्यात मैदानातच वाद झाला होता. त्यावेळी इतर खेळाडूंनी मध्यस्थी करून वाद मिटवला. मात्र, श्रीलंकन खेळाडूंचे ते शब्द वैभवच्या मनात सलत होते. अशातच जेव्हा अंतिम सामन्यात इंडिया ए आणि श्रीलंका ए पुन्हा आमनेसामने आल. आपल्या अपमानाचा बदला घेण्याची सुवर्णसंधी मिळाली आणि त्याने (पान ६ वर...)

# ज्येष्ठ नेते शिवाजीराव शिंदे यांचे निधन



**लातूर (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रातील पुरोगामी आणि समाजवादी चळवळीतील एक अभ्यासू, लढाऊ आणि निःस्वार्थी विचारवंत अशी ओळख असलेले ज्येष्ठ नेते शिवाजीराव शिंदे यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने लक्षावधी कष्टकरी, शेतकरी आणि वंचितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारा एक बुलंद आवाज शांत झाला आहे. त्यांच्या जाण्याने केवळ लातूर जिल्ह्याचीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली असून सर्वपक्षीय नेत्यांकडून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे.

निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु.) येथील एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात १९४६ मध्ये शिवाजीराव शिंदे यांचा जन्म झाला. ग्रामीण भागात वाढलेल्या शिवाजीरावांनी विद्यार्थी दशेपासूनच अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली आणि समाजवादी विचारसरणीचा स्वीकार केला. महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीचे आधारस्तंभ प्रा. ना. य. डोळे, डॉ. बाबा आढाव, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे आणि भाई वैद्य यांच्यासारख्या दिग्गजांच्या थेट मार्गदर्शनाखाली त्यांनी सामाजिक आणि राजकीय कार्यात स्वतःला झोकून दिले होते.

शिवाजीराव शिंदे यांनी जनता दलाचे राज्य सरचिटणीस म्हणून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आणि पक्षसंघटना तळागाळापर्यंत मजबूत केली. त्यांच्यातील अफाट संघटन कौशल्यामुळेच राष्ट्रीय पातळीवरही त्यांची मोठी ओळख निर्माण झाली होती.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शेती व शेतकरी पुन्हा संकटात

आपल्या देशातील सगळ्यात दुर्लक्षित क्षेत्र म्हणजे शेती. शेतकरी जगू नये आणि मरू नये. त्यांच्यासोबतच कधी आसमानी तर नेहमीच सुलतानी संकटाला शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते. व्यापारी व शासकीय अधिकारी यांच्या जाचासोबतच पाऊस नसणे किंवा अति होणे यामुळे शेतकरी सगळ्या बाजूने दडपले जात आहेत. ही परिस्थिती आजची नसून मागच्या शंभर वर्षांपासून अशीच कायम आहे. शेतकरी वगळता इतर सर्वांनाच दोन्ही हाताने पैसे देणारे शासन शेतकऱ्यांच्या कृषी मालाला भाव देण्याची वेळ आली की, डोळे मिटून पांघरुण घेऊन झोपते. याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेसोबतच आपल्याही राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होतो आहे. कारण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, ग्रामीण जीवन आणि लाखो शेतकऱ्यांचे भविष्य आजही मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून आहे. यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीलाच राज्यासमोर उभे राहिलेले चित्र चिंताजनक आहे. जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात राज्यात सरासरीच्या केवळ २६ टक्के पाऊस पडला असून, तब्बल ७४ टक्के तूट नोंदवली गेली आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनची गती मंदावल्याने खरीप हंगामाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी पुन्हा एकदा निसर्गाच्या अनिश्चिततेसमोर हतबल झाले आहेत. कारण या भागामध्ये सिंचनाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. खरीप पेरणीचे आकडे या संकटाची तीव्रता स्पष्ट करतात. गेल्या वर्षीच्या तुलनेत पेरणी क्षेत्रात ६६ टक्क्यांची घट झाली आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारख्या प्रमुख पिकांच्या पेरण्या रखडल्या आहेत. भात, मका आणि बाजरीसारख्या पिकांच्या क्षेत्रातही मोठी घट झाली आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेला शेतकरी योग्य वेळी पेरणी करू शकत नाही, तर घाईने पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याचा धोका आहे. त्यामुळे आर्थिक नुकसानासोबत मानसिक ताणही वाढतो. यामुळे शासकीय शेतीतज्ज्ञ पुरेसा पाऊस पडल्याशिवाय पेरणी करू नका असे आवाहन शेतकऱ्यांना करीत आहेत. राज्यातील जलसाठ्यांची स्थितीही धोक्याची घंटा वाजवत आहे. विष्णुपुरी आणि इतर धरणांमध्ये पाण्याचा साठा अत्यंत कमी राहिलेला आहे. त्याचप्रमाणे जायकवाडीसह अनेक धरणांतील पाणीपातळी झपाट्याने घटत आहे. पुणे विभागातील काही धरणांमध्ये तर साठा १४ टक्क्यांपेक्षाही कमी झाला आहे. अशा परिस्थितीत शासनाने उपलब्ध पाण्याला प्राधान्याने पिण्याच्या वापरासाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय आवश्यक असला तरी तो राज्याच्या जलव्यवस्थापनातील दीर्घकालीन त्रुटीही अधोरेखित करतो. दरवर्षी दुष्काळ, पावसाची तूट किंवा अवकाळी पाऊस यांसारख्या संकटांचा सामना करताना शासन तात्पुरत्या उपाययोजनांवर भर देताना दिसते. यंदाही अल्पकालीन व दुष्काळ सहन करणाऱ्या बियाण्यांचा प्रचार, पर्यायी पीक नियोजन आणि कृषी सल्लागार सेवा यांसारख्या उपाययोजना राबवल्या जात आहेत. या उपायांचा काही प्रमाणात फायदा होईल; मात्र केवळ संकट उद्भवल्यानंतर उपाय शोधण्याची पद्धत बदलण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्राच्या कृषी व्यवस्थेतील सर्वात मोठा विरोधाभास म्हणजे पाणी वापराचे असंतुलन. राज्यातील ६० टक्क्यांहून अधिक सिंचनाचे पाणी ऊस या एकाच पिकासाठी वापरले जाते, तर ऊसाखालील क्षेत्र एकूण लागवडीच्या ५ टक्क्यांपेक्षाही कमी आहे. राजकीय आणि आर्थिक कारणांमुळे ऊस शेतीला मोठे प्रोत्साहन मिळाले; परंतु त्याची किंमत संपूर्ण राज्याला पाणीटंचाईच्या स्वरूपात मोजावी लागत आहे. हवामान बदलाच्या युगात ही पिकपद्धती अधिक काळ टिकाऊ ठरू शकत नाही. यासाठी कृषी धोरणात मूलभूत बदल आवश्यक आहेत. शेतकऱ्यांना तूर, हरभरा, मूग, बाजरी आणि इतर कोरडवाहू पिकांकडे वळण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन दिले पाहिजे. केवळ हमीभाव नव्हे, तर प्रक्रिया उद्योग, साठवण सुविधा आणि बाजारपेठेची हमी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. ऊस कारखान्यांप्रमाणेच कोरडवाहू पिकांवर आधारित कृषी-प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन मिळाले, तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात स्थैर्य येऊ शकते. याशिवाय जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, शेततळी, पर्जन्यजल साठवण आणि भूजल पुनर्भरण यांसारख्या उपाययोजनांची व्यापक अंमलबजावणी आवश्यक आहे. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित होत असताना जलव्यवस्थापनाला सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्राच्या शेतीसमोरील आजचे संकट केवळ कमी पावसाचे नाही; तर दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या संरचनात्मक समस्यांचे ते परिणाम आहे. मान्सूनवर अवलंबून राहण्याची मानसिकता बदलून शाश्वत, हवामान-सुसंगत आणि जलसाक्षर कृषी व्यवस्था उभारण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा दरवर्षी पावसाची प्रतीक्षा, पेरणीची चिंता आणि दुष्काळाची भीती हेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कायमस्वरूपी वास्तव राहील.

# पर्जन्यवने : आजचे संरक्षण, उद्याचे भविष्य



दरवर्षी २२ जून रोजी जागतिक पर्जन्यवन दिन साजरा केला जातो. पृथ्वीवरील जीवनाचा आधार असलेल्या नैसर्गिक संपत्तीमध्ये पर्जन्यवनांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भरपूर पाऊस, दाट वृक्षसंपदा आणि समृद्ध जैवविविधता ही पर्जन्यवनांची वैशिष्ट्ये आहेत. ही वने केवळ प्राणी आणि वनस्पतींचे निवासस्थान नसून, मानवाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या स्वच्छ हवा, पाणी आणि हवामान संतुलनाचीही काळजी घेतात. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यांमुळे वनतोड मोठ्या प्रमाणात होत असून पर्जन्यवनांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी आणि भावी पिढ्यांना सुरक्षित व समृद्ध भविष्य देण्यासाठी पर्जन्यवनांचे संवर्धन व संरक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे. म्हणूनच वनांचे रक्षण, भविष्याचे संरक्षण हा संदेश आज अधिक महत्त्वाचा ठरतो.

पर्जन्यवने ही पृथ्वीवरील सर्वाधिक जैवविविधता असलेली नैसर्गिक परिसंस्था मानली जातात. जगातील असंख्य वनस्पती, प्राणी, पक्षी, कीटक आणि सूक्ष्मजीवांच्या प्रजाती या जंगलांमध्ये आढळतात. यांपैकी अनेक प्रजाती दुर्मिळ असून त्या इतर कोणत्याही ठिकाणी आढळत नाहीत. त्यामुळे पर्जन्यवने ही जैवविविधतेची अमूल्य संपत्ती मानली जातात. या जंगलांमुळे विविध जीवांना अन्न, निवारा आणि प्रजननासाठी आवश्यक वातावरण मिळते. पर्जन्यवनांतील प्रत्येक सजीव पर्यावरणीय साखळीचा एक महत्त्वाचा घटक असतो. एखाद्या प्रजातीचे अस्तित्व धोक्यात आल्यास संपूर्ण परिसंस्थेवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पर्जन्यवने पर्यावरणातील संतुलन राखण्याचे कार्य करतात.

याशिवाय, पर्जन्यवने कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण कमी करतात आणि मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन निर्माण करतात. त्यामुळे हवामान नियंत्रित राहण्यास मदत होते. अशा प्रकारे पर्जन्यवने केवळ जैवविविधतेचे संरक्षण करत नाहीत, तर संपूर्ण पृथ्वीच्या पर्यावरणीय संतुलनासाठीही अत्यंत आवश्यक आहेत.

पर्जन्यवने वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून ऑक्सिजन सोडतात, त्यामुळे जागतिक तापमानवाढ कमी करण्यास मदत होते. तसेच बाष्पोत्सर्जनामुळे पावसाचे चक्र नियमित राहते आणि हवामान संतुलित ठेवले जाते. म्हणून पर्जन्यवने पृथ्वीच्या हवामान नियंत्रणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

पर्जन्यवने पावसाचे पाणी साठवून भूजलसाठे वाढवतात, नद्या व तलावांचे संरक्षण करतात आणि जलचक्र सुरळीत ठेवतात. तसेच मातीची धूप, पूर आणि दुष्काळाचे परिणाम कमी करून जलसंपत्तीचे संवर्धन करतात. त्यामुळे पर्जन्यवने जलस्रोतांच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

पर्जन्यवने झाडांच्या मुळांमुळे मातीची धूप रोखतात आणि जमिनीची सुपीकता टिकवून ठेवतात. तसेच सेंद्रिय पदार्थांमुळे मातीतील पोषक घटक वाढतात, ज्यामुळे शेतीची उत्पादकता आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाते. त्यामुळे मृदासंवर्धनासाठी पर्जन्यवने अत्यंत महत्त्वाची आहेत.

पर्जन्यवने लाकूड, फळे, मध, औषधी वनस्पती आणि इतर मौल्यवान संसाधने पुरवतात, ज्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळते. तसेच औषधनिर्मिती आणि स्थानिक लोकांच्या रोजगारासाठीही ती महत्त्वाची आहेत. त्यामुळे पर्जन्यवने आर्थिक विकास आणि उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहेत.

पर्जन्यवने ही असंख्य वन्यजीवांची सुरक्षित आणि नैसर्गिक निवासस्थाने आहेत. विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, सरपटणारे जीव, कीटक आणि इतर अनेक सजीव या जंगलांमध्ये राहतात. दाट वृक्षसंपदा, मुबलक अन्नस्रोत आणि अनुकूल हवामान यांमुळे वन्यजीवांच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेले सर्व घटक पर्जन्यवनांमध्ये उपलब्ध असतात. त्यामुळे अनेक दुर्मिळ आणि संकटग्रस्त प्रजातींचे जीवन या जंगलांवर अवलंबून असते.

मात्र, वाढती वनतोड आणि मानवी हस्तक्षेप यांमुळे वन्यजीवांच्या अधिवासांचा ऱ्हास होत आहे. जंगलांचे क्षेत्र कमी झाल्याने अनेक प्राण्यांना अन्न व निवारा मिळणे कठीण होते. परिणामी, काही प्रजातींची संख्या झपाट्याने घटते आणि त्या नामशेष होण्याच्या धोक्यात येतात. एखादी प्रजाती नष्ट झाल्यास संपूर्ण अन्नसाखळी आणि पर्यावरणीय संतुलनावर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

वनांचे संरक्षण म्हणजे केवळ झाडांचे संरक्षण नव्हे, तर संपूर्ण जैवविविधतेचे संरक्षण होय. वन्यजीव आणि वनस्पती यांचे अस्तित्व परस्परांशी जोडलेले असल्याने जंगलांचे संवर्धन केल्यास विविध प्रजातींचे जीवन सुरक्षित राहते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल टिकून राहतो आणि भावी पिढ्यांसाठी नैसर्गिक वारसा जपला जातो.

वनतोड ही आजच्या काळातील गंभीर पर्यावरणीय समस्या आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, शेतीचा विस्तार आणि नैसर्गिक संसाधनांच्या वाढत्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात जंगलांचा नाश होत आहे. यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत असून अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

जंगलांचा नाश झाल्याने वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते, कारण झाडे हा वायू शोषून घेण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. परिणामी, जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाची समस्या अधिक गंभीर बनते. तापमान वाढल्यामुळे उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, वादळे आणि इतर नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढू शकते.

वनतोडीमुळे पावसाचे प्रमाण कमी होते आणि जलचक्रावर विपरीत परिणाम होतो. झाडांच्या अभावामुळे वातावरणातील आर्द्रता घटते, ज्यामुळे पर्जन्यमान कमी होण्याची शक्यता वाढते. तसेच, अनेक वनस्पती आणि प्राण्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्याने जैवविविधतेचा ऱ्हास होतो. अनेक दुर्मिळ प्रजाती नामशेष होण्याच्या धोक्यात येतात.

सर्वप्रथम, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. रिकाम्या आणि ओसाड जमिनींवर अधिकाधिक झाडे लावल्यास जंगलांचे क्षेत्र वाढण्यास मदत होते. तसेच लावलेल्या झाडांची योग्य काळजी घेऊन त्यांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

बेकायदेशीर वृक्षतोडीवर कठोर नियंत्रण ठेवणे हा आणखी एक महत्त्वाचा उपाय आहे. जंगलांची अवैध तोड करणाऱ्यांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई केली पाहिजे. वनसंरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास जंगलांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात रोखता येऊ शकतो.

याशिवाय, शाश्वत वनव्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. वनसंपत्तीचा वापर करताना पर्यावरणीय संतुलन अबाधित राहील याची काळजी घेतली पाहिजे. पुनर्वनीकरण, नैसर्गिक संसाधनांचा मर्यादित वापर आणि जैवविविधतेचे संरक्षण यांसारख्या उपाययोजनांमुळे वनांचे दीर्घकालीन संवर्धन शक्य होते.

वनसंवर्धनाबाबत जनजागृती वाढविणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शालेय शिक्षण, सामाजिक उपक्रम, प्रसारमाध्यमे आणि विविध मोहिमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव निर्माण केली पाहिजे. लोकांचा सक्रिय सहभाग मिळाल्यास वनसंवर्धनाची चळवळ अधिक प्रभावी होऊ शकते. अशा एकत्रित प्रयत्नांमुळे वनांचे संरक्षण होऊन पर्यावरणाचा समतोल आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित राहील.

वनसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणामध्ये नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक व्यक्तीने वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा. आपल्या परिसरात अधिकाधिक झाडे लावून त्यांची योग्य काळजी घेतल्यास पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मोठी मदत होते. लहानसहान प्रयत्नांमुळेही मोठ्या प्रमाणावर हरितावरण निर्माण होऊ शकते.

तसेच, कागदाचा आणि लाकडाचा अनावश्यक वापर टाळणे आवश्यक आहे. कागदाचा पुनर्वापर करणे, डिजिटल साधनांचा अधिक वापर करणे आणि लाकडावर अवलंबून असलेल्या उत्पादनांचा मर्यादित वापर करणे यामुळे जंगलांवरील ताण कमी होतो. नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर केल्यास वनतोड कमी होण्यास मदत मिळते.

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करणे हीही नागरिकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. प्लास्टिकचा कमी वापर, पाणी आणि वीज यांचा काटकसरीने वापर, तसेच निसर्गाशी सुसंगत वर्तन यांमुळे पर्यावरणाचे संरक्षण शक्य होते. प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागल्यास वनसंरक्षणाला मोठा हातभार लागू शकतो आणि भावी पिढ्यांसाठी हरित व सुरक्षित पृथ्वी निर्माण करता येते.

पर्जन्यवने ही पृथ्वीची फुफ्फुसे मानली जातात, कारण ती वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन ऑक्सिजन निर्माण करतात आणि संपूर्ण पर्यावरणाचे संतुलन राखतात. त्यामुळे पृथ्वीवरील जीवन टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे अस्तित्व अत्यंत आवश्यक आहे.

जर पर्जन्यवनांचे योग्य प्रकारे संरक्षण केले गेले, तर पर्यावरणातील समतोल राखला जातो, जैवविविधता सुरक्षित राहते आणि मानवासह सर्व सजीवांचे जीवन अधिक सुरक्षित व समृद्ध होते. याउलट, वनांचा ऱ्हास झाल्यास हवामान बदल, जैवविविधतेचा नाश आणि नैसर्गिक संसाधनांची कमतरता यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात.

म्हणूनच, वनांचे रक्षण म्हणजे भविष्याचे संरक्षण हे तत्त्व प्रत्येक नागरिकाने समजून घेऊन त्याचे आचरणात पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. वृक्षसंवर्धन आणि वनसंरक्षण ही केवळ पर्यावरणाची नव्हे, तर आपल्या भावी पिढ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठीची जबाबदारी आहे.

**-डॉ. आरती राणे**
नांदेड
मो.नं. ९८६०६३८५७५

# दुष्काळसदृश्य परिस्थिती

जून महिना संपत आला तरी वरुण राजाने हजेरी न लावल्याने राज्यात दुष्काळाची दाहकता जाणवत आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यावर्षीही मान्सून वेळेत दाखल झाला असला तरी मान्सूनने अद्याप गती पकडली नाही. तळकोकणात पोहचलेला मान्सून राज्याच्या अंतर्गत भागात अजूनही पोहचला नाही. १५ जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र व्यापनारा मान्सून जून महिना संपत आला तरी सर्वदूर पोहचला नाही. मान्सून रेंगाळल्याने खरिपाच्या पेरण्या तर रखडल्याच आहेत शिवाय पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील उभा राहिला आहे. मान्सून रखडल्याने राज्यावर भीषण दुष्काळाचे सावट उभे राहिले आहे.

राज्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. शेतीसाठी तर सोडाच पण पिण्यासाठीही पाणी मिळणे मुश्किल झाले आहे. धरणातील पाणी साठा कमी झाला आहे. अनेक गावातील पाण्याची पातळी खालावली आहे. मराठवाड्यातील काही गावात तर पाण्याची पातळी तीन ते चार मीटरने खालावली आहे. विहिरी, तलाव, नद्यांनी तर केंव्हाच तळ गाठला आहे. एक हंडा पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपिट करावी लागत आहे. राज्य सरकारने राबवलेल्या जलयुक्त शिवार योजनेमुळे काही गावांना दिलासा मिळाला असला तरी टँकरमुक्त महाराष्ट्र हे राज्य सरकारचे स्वप्न अद्याप साकार झाल्याचे दिसत नाही.

आजही राज्यात शेकडो टँकर चालू आहेत. राज्यातील काही लाख नगरीकांवर पाण्यासाठी दाही दिशा फिरण्याची वेळ आली



आहे. एकूणच राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळासदृश्य परिस्थितीमुळे शेतिउद्योग धोक्यात आला आहे. पोटच्या पोरांप्रमाणे सांभाळलेले पशुधन टिकवण्यासाठी शेतकऱ्यांना चारा छावणीकडे धाव घ्यावी लागत आहे. एकूणच पावसाने ओढ दिल्याने शेती उद्योगच धोक्यात आला आहे. पाण्याअभावी ग्रामीण भागातील नागरिक स्थलांतर करू लागले आहेत. पाणी नसल्याने उपवर मुला मुलींचे विवाह रखडले आहेत. एकूणच पाऊस नसल्याने राज्याची दैन्यावस्था झाली आहे.

यावर्षी वेळेत पाऊस सुरू न झाल्याने आणि राज्यावर अल निनोचे संकट असल्याने राज्य भीषण दुष्काळाच्या छायेत आले आहे. सर्वाधिक जलसिंचन आणि धरणे महाराष्ट्रात असूनही महाराष्ट्राला नेहमीच अशा दुष्काळसदृश्य परिस्थितीला किंवा दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. ही जरी नैसर्गिक आपत्ती असली तरी याला आपणच जबाबदार आहोत. उपलब्ध पाण्याचा कसाही वापर करणं, पाणी वापराचं नियोजन नसणे, पावसाचे पाणी साठवण्यासाठी सहकार्य व नियोजनाचा अभाव, शेतकरी, व्यापारी, उद्योगपती, कामगार व सर्वसामान्य नागरिक यांनी पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीची उपाययोजना न करणे, पाणी गळती, गरजेपेक्षा अधिक पाण्याचा वापर, बेसुमार वाळू उपसा यामुळे राज्य पाण्याची तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

झाडे तोड, जंगल तोड यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे त्यामुळे ऋतुचक्रही बदलत आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत चालले आहे. जगातील सर्वाधिक उष्ण शहरात महाराष्ट्रातील शहरांचा समावेश होऊ लागला आहे. चुकीच्या पीक पद्धतीमुळे जमिनीचा पोत कमी होऊ लागला आहे. लोकसंख्या जरी वाढत चालली तरी पाण्याचे साठे मर्यादित आहेत. त्यामुळे पाण्याची टंचाई कायम जाणवत राहणार आहे. पाण्याचा वापर, पाणी साठवणं, पाणी जिरवणं आणि पाण्याचे पुनर्भरण करणे याबाबत आपण आज जर आपण सावध झालो नाही तर भविष्यात खूप मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल.

एवढं निश्चित की इस्राएल सारखा छोटा देश पावसाच्या अत्यल्प पाण्याचे नियोजन करुन समृद्ध होऊ शकतो तर आपण का नाही? इस्राएलपेक्षा भारतात खूप जास्त पाऊस पडतो. या पावसाच्या पाण्याचे संचय हा दुष्काळावर उपाय ठरू शकतो. त्यासाठी जलसंधारणाच्या योजना आखणे व त्या पूर्णत्वास जाणे गरजेचे आहे. पावसाच्या पाण्याचा थेंबही वाया जाऊ न देता ते पाणी वाचवायला हवे. त्यासाठी रेन हार्वेस्टिंग सिस्टिमचा वापर करायला हवा. केवळ मोठ्या इमारतीतच नव्हे तर लहान घरातही विशिष्ट तंत्र वापरून पाणी साठवता येऊ शकते. सरकारी कार्यालये, अस्थापने, बँका, सहकारी गृहनिर्माण सोसायट्या, शाळा, महाविद्यालये यांना रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करायला हवे. वाढती वृक्षतोड थांबवून जास्तीतजास्त वृक्ष लागवड करायला हवी. लावलेले वृक्ष जगवायला हवेत.

शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला एक वृक्ष देऊन त्याची वाढ करायला सांगावी. यासाठी हवे तर विद्यार्थ्याला अतिरिक्त गुण देण्यात यावे. चुकीच्या पीकपद्धती बदलायला हव्यात. ऊस, केळी यासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना ठिबक सिंचन सक्तीचे करायला हवे. श्रमदानातून जलसंधारणाचे कामे करून जनतेचे प्रबोधन करायला हवे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालायला हवा. दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीला आपणच जबाबदार असल्याने तिच्यावर मात करण्यासाठी सर्वांनी हातात हात घालून काम करायला हवे. दुष्काळ निवारण ही केवळ सरकारची जबाबदारी नसून ती आपल्या सर्वांचीच आहे

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# सृष्टी जगेल तरच आपण जगू

झाडांनीही पापच केलेले असते असं जर कोणी म्हटलं तर आपल्याला आश्चर्यच वाटेल. कारण झाडांबद्दल आपल्या भावनाच मरण पावलेल्या आहेत. परंतु झाडांनीही दाखवून दिले की, आम्ही किती उपयोगाचे आहोत. आम्ही जर नसलो तर या पृथ्वीतलावर पाणी पडू शकणार नाही. तापमानही वाढेल व सृष्टी नष्ट होईल. याबाबतीत एक कथा आहे.

प्राचीन काळात राजे पद्धती अस्तित्त्वात होती. त्यात सैनिक एकमेकांशी लढत व ते एकमेकांना मारत असत. ते पापच होत असे. कारण एकमेकांचा विनाकारण जीव घेणे हे पापच होते. सैनिक हे आपल्या धन्यासाठी लढत. प्रसंगी आपल्या धन्यासाठी ते परकीय शत्रू सैन्याचा बळी घेत. यात दोष त्यांचा नसायचा. तो दोष राजाचा असायचा. ते बिचारे आपल्या पोटासाठी राजाकडे नोकरी करीत व आपल्या पोटासाठी ते आपला जीवही देत आणि जीवही घेत असत. परंतु त्याचा दोष राजाला लागत नसे. जेव्हा पापाची शिक्षा द्यायची वेळ यायची.

ते सैनिक जेव्हा मरत असत आणि त्यानंतर ते यमनगरीत जात. तेव्हा न्यायिक देवता यम त्यांना शिक्षा सुनावीत असतांना फार कठीण शिक्षा देत असे. तेव्हा राजा म्हणत असे की दोष माझा कसला, मी तर कर्तव्य केलं. मग राजानं तसं म्हणताच यम न्यायिक भावनेतून सैनिकांनाच दोष देत त्यांना भयंकर मोठ्यात मोठ्या शिक्षा देत असे आणि राजाचा दोष असूनही त्यांना हलक्या दर्जाच्या शिक्षा. एकदाचा तो प्रसंग. त्यावेळेस सर्व सैनिक एका जत्थ्यानं न्यायिक देवता यमाकडे गेले. म्हणाले, यम महाशय, आम्ही आमच्या पोटासाठी सैनिक म्हणून लढतो. स्वतः प्राण देतो आणि आमच्याच भरवशावर राजाची चांदी चांदी होते. त्यात आम्हाला काहीच फायदा होत नाही. उलट दोष आमचाच दिसतो राजा आमच्याचमुळे विलासात जगतो. आम्ही जर नसतो तर राजाला विलासात जगता आलंच नसतं. परंतु आम्हाला हे मान्य की दोष आमचाच असतो. परंतु आम्हाला अशी शिक्षा द्या की आमच्या दोषाचं क्षालन होईल व आम्ही शिक्षा तर भोगू. परंतु त्या शिक्षेनंतर दोषमुक्त होवू. त्या मृत सैनिकांचं ते बोलणं. त्यांनी आपापल्या वेदना मांडल्या होत्या यमदेवतेसमोर. त्यावर यमदेवता विचार करु लागली. विचार करु लागली की यावर काही उपाय तरी निघू शकेल काय?

विचारांती यमदेवतेला आठवलं की आपण या सर्व सैनिकांना झाडं बनवू. ही मंडळी झाडं जर बनली तर यांचा दोष असल्यानं यांना सुर्याचं कडक उन्हाचे चटके शोषावे लागेल. पळून जायची इच्छा जरी असली तरी ते कडेला पळून जावू शकणार नाहीत. शिवाय यांनी ज्यांना ज्यांना ठार केलं. ते सर्वजण यांचे अवयव छाटतील व यांना अमानुष वेदना देतील. ज्यातून यांना भयंकर त्रास होईल. त्यानंतर राजाकडे विचारांती वळून यमदेवतेनं विचार केला की राजानं एक राजा असल्यानं आपलं कर्तव्य जरी केलं असेल, तरी तोही दोषी आहे. त्यानं औषधीचं झाड बनावं. ज्या झाडाच्या खाली लोकं दिवे लावतील. दिव्यातील जास्तीचे भेसळयुक्त तेल जमीनीत जावून झाडांच्या मुळांना व्यवस्थीत पूरक खाद्य मिळणार नाही व ते मरतील.

काही दिवसानं झाडं नष्ट होतात. ते नष्ट झाले की आपल्या पापरुपी दोषातून मुक्त होतात. तेव्हापर्यंत त्यांची घाबरुन पळून जायची इच्छा जरी असली तरी ते पळून जावू शकत नाहीत. दोषमुक्त होईपर्यंत. काल सतत युद्ध होत असत. त्यामुळंच जास्तीत जास्त सैनिक मरत असत. त्यामुळंच झाडं जास्त होती. जंगलंची जंगलं होती व वातावरणात ऑक्सिजनची मात्रा जास्त होती. परंतु आज तसं नाही. आज युद्ध होत नाहीत. म्हणूनच झाडंही कमी होत आहेत. त्यामुळंच पर्यावरण ढासळत चालले आहे.

झाडं ही ऑक्सिजन देतात. ऑक्सिजन हवेत प्रवाहीत करतात. तो ऑक्सिजन हवेत वर वर जात असतो. तो ऑक्सिजन वर गेल्यानंतर त्याचा संपर्क हायड्रोजनशी येतो व पाऊस पडतो. कारण हायड्रोजन हा हवेतील एक घटक आहे व तो हलका वायू असल्यानं पृथ्वीच्या कक्षेत नसतो. तो हवेच्या वरच्या भागात असतो. जेव्हा ऑक्सिजन वर जावून हायड्रोजनच्या संपर्कात येतो. तेव्हा पाऊस पडतो. परंतु हे जरी खरं असलं तरी मुख्य बाब ही की हवेत जास्तीत जास्त ऑक्सिजन प्रवाहीत व्हायला हवं. तेव्हाच पाऊस येणार. नाहीतर नाही. मग त्यासाठी पृथ्वीतलावर जास्तीत जास्त झाडं लावायला हवीत हेही तेवढंच खरं.

विशेष बाब ही की झाडं आपण लावायला हवीत. ते आपल्या हातात आहे. मग सैनिक शहीद होवो की न होवो. त्या गोष्टीशी आपला संबंध नाही. मात्र झाडं लावणं आपल्या हातात आहे. त्यामुळंच प्रत्येकानं एकतरी नाही तर दोनतरी झाडं लावलीच पाहिजेत. लावायलाच पाहिजेत. जेणेकरुन तापमान वाढणार नाही व सृष्टी जगेल. सृष्टी जगेल तरच, आपण जगू. नाहीतर सृष्टीसोबत आपणही काळाच्या ओघात केव्हा संपून जावू. ते आपल्याला कळणारही नाही. हेही तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महापालिकेतर्फे गोदावरी नदी घाट परिसरात स्वच्छता मोहीम यशस्वी

## डीआयजी शहाजी उमाप, महापौर कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे झाले स्वच्छतादूत

**नांदेड (प्रतिनिधी)** –आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून महापालिकेच्या वतीने दि. २१ जून रोजी सकाळी गोदावरी नदी घाट परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. 'स्वास्थ्यासाठी योग आणि पर्यावरणासाठी स्वच्छता' हा संदेश देत महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. गोदावरी नदी केवळ एका दिवसाच्या मोहिमेने स्वच्छ होणार नाही, तर तिला संपूर्णपणे प्रदूषणमुक्त करण्यासाठी वर्षातील ३६५ दिवस सातत्याने काम करावे लागेल, असे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी यावेळी केले.



सदर स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ महापौर कविता मुळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गोदावरी नदीच्या मुख्य घाटासह आसपासच्या परिसरातील कचरा, प्लास्टिकच्या पिशव्या, निर्माल्य आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर चकाचक करण्यात आला. महापालिकेच्या स्वच्छतादूत आणि स्वच्छता विभागाच्या पथकाने आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने घाटाची स्वच्छता केली.

या प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, योग आपल्याला शारीरिक व मानसिक आरोग्य देतो, तर स्वच्छता आपल्या परिसराला निरोगी ठेवते. गोदावरी नदी ही नांदेडची जीवनवाहिनी असून, तिच्या घाटांचे संवर्धन आणि स्वच्छता राखणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे. केवळ आजच्या दिवसापुरते मर्यादित न राहता नागरिकांनी नदी पात्रात कचरा न टाकता हे स्वच्छता अभियान पुढेही सुरू ठेवावे.

या मोहिमेत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, स्वच्छता विभागाचे उपायुक्त नितीन गाढवे, स्वच्छता विभागाचे सहायक आयुक्त मो. गुलाम सादेक, सर्व विभाग प्रमुख, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सर्व स्वच्छता निरीक्षक, मनपा कर्मचारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरणप्रेमी आणि शेकडो नागरिकांनी श्रमदान केले. गोळा केलेला सर्व कचरा महापालिकेच्या कचरा वाहतूक वाहनांद्वारे योग्य विल्हेवाटीसाठी डम्पिंग ग्राउंडवर पाठवण्यात आला आहे. नदी प्रदूषण करणाऱ्या घटकांवर महापालिकेकडून यापुढे सातत्याने देखरेख व आवश्यक कारवाई केली जाईल तसेच गोदावरी नदीचे पावित्र्य राखण्यासाठी आणि शहर सुंदर बनवण्यासाठी मनपा प्रशासन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी करण्यात आला. महापालिकेच्या या कौतुकास्पद उपक्रमाबद्दल नदी घाट परिसरातील नागरिकांनी आणि भाविकांनी प्रशासनाचे आभार मानले.

# नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाची यशस्वी सांगता




**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाच्या इतिहासात प्रथमच विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांच्या मान्यता व मार्गदर्शनाखाली दि. १५ ते २० जून या कालावधीत सहा दिवसीय नागरी संरक्षण मूलभूत प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दक्षिण मध्य रेल्वे नागरी संरक्षण संघटनेतर्फे आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश नागरी संरक्षण स्वयंसेवकांची आपत्कालीन परिस्थितीतील तयारी व प्रतिसाद क्षमता अधिक सक्षम करणे हा होता. या प्रशिक्षणामध्ये अग्निसुरक्षा, मूलभूत जीवन रक्षक उपाय, बचाव व सुटका तंत्र तसेच आपत्ती व्यवस्थापन या विषयांवरील सैद्धांतिक मार्गदर्शनाबरोबरच सिकंदराबाद व नांदेड येथील अनुभवी प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नांदेड येथील नागरी संरक्षण विभागाचे विभागीय आपत्कालीन अधिकारी श्रीनिवास सूर्यवंशी यांनी समन्वयाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. तसेच नांदेडचे नागरी संरक्षण निरीक्षक महारुद्र डिगोळे, उत्तम जाधव, शिवाजी सुतारे, सिकंदराबाद येथून आलेले वरिष्ठ नागरी संरक्षण निरीक्षक सुधीर बाबु, अब्दुल हकीम आणि रामबाबू यांनी विशेष सहकार्य करून प्रशिक्षणार्थींना आपत्कालीन परिस्थितीत प्रभावीपणे कार्य करण्यासाठी सक्षम बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

समारोप समारंभाचे आयोजन नांदेड येथील डीआरएम परिषद सभागृहात करण्यात आले. यावेळी नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी प्रशिक्षणार्थींच्या उत्साह व समर्पणाचे कौतुक केले. तसेच आपत्ती व्यवस्थापनात शारीरिक तंदुरुस्ती, सततची तयारी आणि नियमित सराव यांचे महत्त्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमास वरिष्ठ विभागीय सुरक्षा आयुक्त, नांदेड दीपचंद्र आर्य तसेच दक्षिण मध्य रेल्वे मजदूर युनियन नांदेडचे सचिव टी. मणी कुमार यांनीही उपस्थित राहून आपत्ती व्यवस्थापन व जनसेवेमध्ये नागरी संरक्षण स्वयंसेवकांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली.

मान्यवरांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले आणि प्रशिक्षणा दरम्यान प्राप्त झालेले ज्ञान व व्यावहारिक कौशल्ये रेल्वे प्रशासन तसेच समाजाच्या आपत्कालीन प्रतिसाद क्षमतेला अधिक बळकटी देतील, असा विश्वास व्यक्त केला. प्रशिक्षणार्थींना पारितोषिके व स्मृतिचिन्हांचे वितरण करून तसेच आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत तीन संशयित चोरट्यांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत रेल्वे सुरक्षा बल नांदेडच्या गुन्हे गुप्तवार्ता शाखा व सरकारी रेल्वे पोलीस छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त पथकाने तीन संशयित चोरट्यांना ताब्यात घेण्यात यश मिळविले.

बुधवार, दि. १७ जून रोजी १४:२५ वाजता, छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर, गाडी क्रमांक १२७८८ नागरसोल–नांदेड एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान संयुक्त पथक गस्त घालत असताना तीन इसम संशयास्पद हालचाली करताना आढळून आले. हे इसम प्रवाशांच्या सामानाची चोरी करण्याच्या उद्देशाने संधीची वाट पाहत असल्याचे निदर्शनास आले. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांमध्ये मकसूद सलीम, जुम्मन साहा आणि मकसूद साहा यांचा समावेश आहे. चौकशीदरम्यान संबंधित व्यक्तींना रेल्वे स्थानकावर उपस्थित राहण्याबाबत कोणतेही समाधानकारक कारण सांगता आले नाही. त्यांच्या संशयास्पद वर्तनामुळे त्यांना ताब्यात घेऊन सरकारी रेल्वे पोलीस, छत्रपती संभाजीनगर यांच्या स्वाधीन करण्यात आले.

सरकारी रेल्वे पोलिसांनी गुन्हा क्र. ४१/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ११२ व ११७ अंतर्गत दिनांक १७ जून रोजी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे सुरक्षा बल व सरकारी रेल्वे पोलीस यांच्याकडून राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन यात्री सुरक्षा मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

# पीपल्स कॉलेजमध्ये संस्था पदाधिकाऱ्यांशी संवादसभा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स कॉलेज नांदेड येथे संस्था पदाधिकाऱ्यांशी संवाद व सहविचार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील हे होते. यावेळी उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव सौ. श्यामल दीपनाथ पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष दत्ता भगत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे उपस्थित होते.



प्रथम प्राचार्यांनी बैठक आयोजनाचे प्रास्ताविक केले. नंतर कार्यकारिणी सदस्य तथा मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे, प्रा. रोडे, प्रा. कल्पना जाधव, प्रा. विजय कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमामध्ये संस्थेच्या शैक्षणिक धोरणांबाबत, महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाबाबत तसेच विद्यार्थी केंद्रित उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्राध्यापकांनीही विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवर आपली मते मांडत संस्थेच्या प्रगतीसाठी उपयुक्त सूचना केल्या. संवादात्मक वातावरणात पार पडलेल्या या सहविचार कार्यक्रमामुळे संस्था व महाविद्यालय यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला.

याप्रसंगी राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. विशाल पतंगे यांची शैक्षणिक उपप्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. संस्थेच्या सचिव सौ. श्यामल दीपनाथ पत्की यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थितांनी प्रा. डॉ. विशाल पतंगे यांचे अभिनंदन करत त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. या बैठकीचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांनी केले तर आभार प्रा. अभय दातार यांनी मानले.

# श्री दत्तप्रभू प्रा. व उच्च प्रा. शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –श्री दत्तप्रभू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा, मालेगाव रोड, तरोडा (खु.) नांदेड येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने नित्य योगा सेवा समितीच्या वतीने विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले होते. नित्य योग सेवा समिती नांदेडचे योग शिक्षक ओम पांचाळ व बालकिशन पसलवाड यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारची योगासने करून दाखवली तसेच विद्यार्थ्यांकडून त्यांचे प्रात्यक्षिक करून घेतले. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते, बुद्धीचा विकास होतो आणि मन प्रसन्न राहते, असे विचार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी यांनी याप्रसंगी व्यक्त केले. शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन काळे जी. एस. यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आगलावे आर. पी., हिवराळे एस. डी., पापुलवार एस. एन., नागरगोजे पी. जी., गायकवाड ए. एस. आणि सावंत पी. बी. यांनी परिश्रम घेतले.

# शिवसेना उपतालुका प्रमुखपदी गणपत सोळंके यांची निवड



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – शिवसेना उपतालुका प्रमुखपदी गणपत सोळंके यांची निवड झाल्याचे नियुक्तीपत्र शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे यांच्या हस्ते देण्यात आले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हा प्रमुख बबनराव बारसे यांनी जिल्हा परिषद लहान गटातील निमगाव येथील शिवसेनेचे सक्रिय शिवसैनिक गणपत सोळंके यांच्या कार्याची दखल घेऊन शिवसेना उपतालुकाप्रमुखपदी निवड झाल्याचे नियुक्तीपत्र देण्यात आले. उपतालुकाप्रमुखपदी गणपत सोळंके यांची निवड झाल्याबद्दल माजी सभापती दिलीपराव देवगुंडे, सरपंच गिरजाराव नरोटे, गोविंद भरकड, कचरू पाटील, सरपंच बालाजी जगताप, पिराजी भिसे, पांडुरंग मोळके, शिवाजी कांबळे, रामा तळणे, पिराजी सोळंके, अंकुश मोळके, गोरखनाथ सोळंके, श्रीराम मोळके, सुभाष कांबळे, बळी वाकोडे, पांडुरंग मोळके, बाळू मोळके यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# नांदेड जिल्हा परिषद आरोग्य विभागाचा स्तुत्य उपक्रम; स्थलांतरित मजुरांसाठी 'आरोग्य साथी' प्रशिक्षण संपन्न

**नांदेड नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्ह्यातील हजारो मजूर दरवर्षी आपल्या कुटुंबासह ऊसतोडीसाठी स्थलांतरित होतात. या स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांना फडावरच तातडीने प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने 'आरोग्य साथी' हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

नुकतेच नांदेड येथे 'आरोग्य साथी प्रशिक्षण पुस्तिका' आणि नियोजित आराखड्यानुसार 'आरोग्य साथी' प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हा प्रशिक्षण कार्यक्रम नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली पार पडला. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले होते.

या विशेष आरोग्य शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षतेखाली अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सलमा हिराणी उपस्थित होत्या. प्रशिक्षण सत्रादरम्यान डॉ. सलमा हिराणी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना 'आरोग्य साथी' उपक्रमाची गरज आणि मजुरांच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती दिली. स्थलांतरादरम्यान मजुरांना भेडसावणारे विविध आजार, लहान मुलांचे व महिलांचे आरोग्य, कुपोषण, तसेच फडावरच द्यावयाचे प्राथमिक उपचार आणि घ्यावयाची काळजी याविषयी त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला श्रीमती बेरलीकर व रफिक शेख हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी आरोग्य साथींना तांत्रिक व व्यावहारिक कामांविषयी मोलाचे धडे दिले.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील हदगाव, मुखेड आणि तुप्पा या भागांतून मोठ्या संख्येने 'आरोग्य साथी' (आरोग्य स्वयंसेवक) उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान सर्व आरोग्य साथींना आरोग्याची काळजी घेणे, प्रथमोपचार किटचा वापर करणे आणि गंभीर परिस्थितीत रुग्णांना जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात रेफरल सेवा कशी उपलब्ध करून द्यायची याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले.

जिल्हा परिषद नांदेडच्या आरोग्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या या विशेष उपक्रमामुळे स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या आरोग्य सुविधेत मोठी सुधारणा होईल, असा विश्वास या प्रसंगी व्यक्त करण्यात आला.

# राज्यसभा सदस्य राजेंद्र जैन यांची आ. चिखलीकर यांच्या कार्यालयास भेट



**नांदेड (प्रतिनिधी)**– राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार राजेंद्र जैन यांनी रविवारी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष या जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड आणि आ. चिखलीकर परिवाराच्या वतीने खा. जैन यांचे स्वागत केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस मोहम्मद कान पठाण, भाजपाच्या महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा सौ. प्रणिताताई देवरे – चिखलीकर, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, उदय चव्हाण यांच्यासमवेत नांदेड महानगर, ग्रामीणचे कार्यकर्ते, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

या भेटीत खा. जैन यांनी आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, पक्षाची संघटनात्मक बांधणी, आगामी ध्येय धोरणे याबाबत आमदार चिखलीकर यांच्याशी सखोल चर्चा केली.

# योगा हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक व्हावा –सौ. प्रणिता देवरे–चिखलीकर




**नांदेड (प्रतिनिधी)** –पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टी मार्गदर्शनात योगा ही जागतिक चळवळ बनली आहे. योगा हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक व्हावा, असे आवाहन भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा तथा जिजाऊ माँ साहेब महिला अर्बन बँकेच्या अध्यक्षा सौ. प्रणिता देवरे–चिखलीकर यांनी केले.

सहकार भारतीच्या माध्यमातून भाग्यलक्ष्मी बँक मुख्यालय नांदेड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सौ. प्रणिता देवरे–चिखलीकर बोलत होत्या.

यावेळी पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आजच्या धावपळीच्या, दगदगीच्या आणि वाढत्या मानसिक तणावाच्या युगात निरोगी जीवन जगणे हे प्रत्येकासमोरील एक मोठे आव्हान बनले आहे. अशा काळात संपूर्ण जगाला आरोग्याचा आणि शांततेचा अचूक मार्ग दाखवणारी भारताची प्राचीन परंपरा म्हणजेच 'योग'.दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. या बरोबरच सहकार क्षेत्रासह योगा हे आपले आद्य कर्तव्य समजून प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींनी योगाचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी योगशिक्षक व्ही. डी. बिराजदार, सहकार भारती नांदेड जिल्हा अध्यक्ष प्रभाकरराव महाजन, जिल्हा महामंत्री दत्तात्रय उबाळे, संघटन मंत्री प्रशांत तीर्थे, भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिभा पराडकर, जिजाऊ अर्बन को–क्रेडिट सोसायटी क्रेडिट नांदेड अध्यक्षा डॉ. सोपानराव क्षीरसागर यांच्यासह मोठ्या संख्येने योगसाधक उपस्थित होते.

# नवनिर्वाचित खासदार राजेंद्र जैन यांचा नांदेडमध्ये सत्कार

## जैन समाज बांधवांसह विविध क्षेत्रातील मंडळींची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील उद्योजक अरुण काला, राजू काला, हदगाव तालुक्यातील पळसाचे उपसरपंच संजय काला यांचे मेव्हणे तथा गोंदिया एज्युकेशन सोसायटीचे सचिव राजेंद्र जैन यांची नुकतीच राज्यसभेवर निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल रविवार, दि. २१ जून रोजी शहरातील व्हीआयपी रोडवरील लीला बँक्वेट हॉल येथे जैन समाज बांधवांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



या सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, माजी आमदार अमरनाथ राजूरकर, माजी महापौर विजय येवनकर यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रासह समाजबांधव व काला परिवाराची उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नांदेडचे जावई म्हणून खासदार राजेंद्र जैन यांचे अभिनंदन करून आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

खा. राजेंद्र जैन यांनी जिल्ह्यातील समाज बांधवासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मंडळींनी केलेल्या सन्मानाबद्दल समाधान व्यक्त करीत योग्य ते मार्गदर्शन केले.

पळसा गावकऱ्यांच्यावतीने पळसा येथील कन्या नांदेड शहराच्या प्रथम नागरिक महापौर कविता मुळे यांच्या हस्ते खा. जैन यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी पळसा येथील सरपंच प्रभाकर धाडेराव, उपसरपंच संजय काला, माजी सरपंच रणजित कांबळे, गोपाल मिश्रा, शंकरराव कदम, कुबेरराव राठोड किन्हाळकर, कामाजीराव निमडगे, रामराव मस्के, घंगाळे, शुभम तिळवे, सामाजिक कार्यकर्त्या सविता निमडगे, दिनेश दहीभाते यांच्यासह प्रभाकर दहिभाते बरडशेवाळेकर यांच्यासह पळसा परिसरातील नागरिक उपस्थित होते.

CMYK

# प्रगतीमंत्र



# परदेशात डॉक्टर अन् नर्स म्हणून नोकरीसाठी आवश्यक ओईटी परीक्षा आहे काय?

**दरवर्षी भारतातील हजारो डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट हे ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आणि कॅनडा यांसारख्या इंग्रजी भाषिक देशांमध्ये कामासाठी जातात. तेथे नोकरी मिळवण्यासाठी त्यांच्या क्षेत्रातील प्राविण्य किंवा क्लिनिकल कौशल्ये पुरेशी नाहीत; आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना इंग्रजी भाषेतील त्यांचे प्रभुत्व देखील सिद्ध करावे लागते. यामागील तर्क असा आहे की, जेव्हा आरोग्यसेवा कर्मचाऱ्याला इंग्रजी येत असेल, तेव्हाच तो रुग्णांशी संवाद साधू शकेल.**

आरोग्यसेवा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अनेकदा असे वाटते की, केवळ IELTS परीक्षा उत्तीर्ण केल्याने त्यांना नोकरी मिळेल, कारण ही सर्वात लोकप्रिय इंग्रजी भाषेची परीक्षा आहे. तथापि, हे खरे नाही, कारण अनेक देशांमध्ये वैद्यकीय क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी ऑक्युपेशनल इंग्लिश टेस्ट (OET) नावाच्या परीक्षेतील गुणांची आवश्यकता असते. इतर इंग्रजी परीक्षांच्या विपरीत OET विशेषतः आरोग्यसेवा क्षेत्रासाठी तयार केली गेली आहे. चला आज या परीक्षेबद्दल अधिक जाणून घेऊया...

## OET म्हणजे काय?

ऑक्युपेशनल इंग्लिश टेस्ट (OET) ही एक आंतरराष्ट्रीय इंग्रजी भाषेची परीक्षा आहे. आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या भाषिक प्रवीणतेची ही परीक्षा आहे. ही परीक्षा केंब्रिज बॉक्सहिल लँग्वेज असेसमेंटद्वारे मॅनेज केली जाते आणि २० हून अधिक देशांमधील आरोग्यसेवा नियामक मंडळे आणि परिषदांद्वारे मान्यताप्राप्त आहे. अमेरिका, युके, न्यूझीलंड, सिंगापूर आणि कॅनडा यांसारख्या देशांमध्ये या स्कोअरला सर्वाधिक मागणी आहे.

## OET सर्वोत्तम का आहे?

आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी तयार केलेली परीक्षा : OET चे सर्व विभाग (वाचन, लेखन, श्रवण आणि संभाषण) वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित आहेत. यामुळे आरोग्यसेवा व्यावसायिकांना उत्तरे देणे सोपे जाते.

व्यावसायिकदृष्ट्या अधिक प्रभावी : ही परीक्षा विशेषतः आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी तयार केली आहे, ज्यामुळे त्यात वैद्यकीय संज्ञा वापरण्याची शक्यता जास्त असते. यामुळे त्यांना ज्या प्रकारच्या परिस्थितीत काम करायचे आहे, त्या समजण्यास मदत होते.

जागतिक मान्यता : OET ला जगभरातील प्रमुख नियामक संस्थांकडून मान्यता आहे, ज्यात NMC (युके), GMC (युके), AHPRA (ऑस्ट्रेलिया), ECFMG (यूएसए), आणि CGFNS (यूएसए) यांचा समावेश आहे.

व्हिसाचे फायदे : युके, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि आयर्लंडसह अनेक देश व्यावसायिक नोंदणी आणि व्हिसा अर्ज या दोन्हीसाठी OET स्कोअर स्वीकारतात.

## OET कशासाठी आहे?

OET ही परीक्षा १२ वेगवेगळ्या आरोग्यसेवा व्यवसायांसाठी तयार केली आहे, ज्यात दंतचिकित्सा, आहारशास्त्र, वैद्यकशास्त्र, नर्सिंग, व्यावसायिक उपचार (ऑक्युपेशनल थेरपी), नेत्रचिकित्सा (ऑप्टोमेट्री), औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी), फिजिओथेरपी (फिजिओथेरपी), पादचिकित्सा (पॉडियॅट्री), रेडिओग्राफी, स्पीच पॅथॉलॉजी, पशुवैद्यकीय विज्ञान.



## ओईटी स्पीकिंग विभागाची तयारी कशी करावी?

ओईटी (OET) परीक्षा देणाऱ्या आरोग्यसेवा व्यावसायिकांमधील सर्वात मोठ्या चिंतेपैकी एक म्हणजे स्पीकिंग (Speaking) विभाग. त्यांना वाटते की ते प्रश्नांची उत्तरे सहज देऊ शकतील, पण कधीकधी, अवघड आणि गोंधळात टाकणाऱ्या संज्ञांमुळे उत्तर देणे कठीण होऊ शकते. अमित उपाध्याय यांना स्पीकिंग विभागाची तयारी कशी करावी असे विचारले असता, ते म्हणाले, ओईटी उत्तीर्ण होण्यासाठी माझा सल्ला असा आहे, की फक्त परीक्षेची तयारी करू नका. याला रुग्णालयातील खऱ्या संभाषणासारखे माना आणि आरोग्यसेवा संवादावर लक्ष केंद्रित करा. भूमिका-पालनावर (role-playing) भर द्या. आपल्या मित्रांसोबत किंवा सहकाऱ्यांसोबत रुग्णाची भूमिका साकारण्याचा सराव करा. सोपी भाषा वापरा. वैद्यकीय संज्ञा (जसे की रक्तदाब किंवा साखर) अशा सोप्या भाषेत समजावून सांगा, जी सामान्य माणसालाही समजू शकेल. सहानुभूती दाखवणे देखील महत्त्वाचे आहे. रुग्णाला मध्येच थांबवू नका; त्यांचे ऐका आणि त्यांना असे जाणवू द्या की तुम्ही मदतीसाठीच आहात. ते पुढे म्हणतात, जे उमेदवार सर्वोत्तम कामगिरी करतात, ते याकडे इंग्रजीची परीक्षा म्हणून पाहणे थांबवतात. ते याकडे त्यांच्या संवाद कौशल्यांची परीक्षा म्हणून पाहतात, जी त्यांना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत परदेशात रुग्ण आणि त्यांच्या टीमसोबत काम करण्यासाठी आवश्यक असेल.



## भारतीय काय करू शकतात?

जेव्हा ओईटीचे प्रादेशिक संचालक (दक्षिण आशिया) आणि अभ्यास तज्ञ अमित उपाध्याय यांना विचारण्यात आले की, ओईटीमध्ये चांगले गुण मिळवण्यासाठी भारतीय आरोग्यसेवा व्यावसायिकांनी कशावर लक्ष केंद्रित करावे, तेव्हा त्यांनी सांगितले, 'ओईटीची तयारी करणारे आरोग्यसेवा व्यावसायिक (डॉक्टर, नर्स इत्यादी) अनेकदा एक मोठी चूक करतात. त्यांना वाटते की ही फक्त त्यांचे इंग्रजी तपासण्याची परीक्षा आहे, पण प्रत्यक्षात ही परीक्षा ते रुग्णालयाच्या वातावरणात किती चांगल्या प्रकारे संवाद साधू शकतात याची असते. परिस्थितीनुसार, रुग्णांना धीर देण्याची, उपचार योजना समजावून सांगण्याची, जीवनशैलीतील बदलांचा सल्ला देण्याची किंवा शस्त्रक्रियेबद्दलच्या चिंता दूर करण्याची गरज भासू शकते. ही चाचणी केवळ उत्तरे पाठ करण्यासाठी नाही. आरोग्यसेवा व्यावसायिक रुग्णांशी कसा संवाद साधतो आणि त्यांच्या प्रश्नांना कसा प्रतिसाद देतो याचे मूल्यांकन यात केले जाते.

> "आरोग्यसेवेतील संभाषणे ही सामान्य संभाषणांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. रुग्ण अनेकदा घाबरलेले, गोंधळलेले किंवा वेदनेत असतात. अशा परिस्थितीत माहिती स्पष्टपणे समजावून सांगणे, रुग्णाचे काळजीपूर्वक ऐकणे, सहानुभूती दाखवणे आणि त्यांचा विश्वास संपादन करणे हे अचूक इंग्रजी बोलण्याइतकेच महत्त्वाचे आहे. उमेदवार अनेकदा अयशस्वी होतात कारण ते रुग्णाच्या भावना समजून घेण्याऐवजी केवळ वैद्यकीय माहिती देण्यावर लक्ष केंद्रित करतात. रुग्णाच्या भावना समजून घेण्याचे महत्त्व स्पीकिंग टेस्टमध्ये सर्वात स्पष्टपणे दिसून येते. परीक्षार्थीला दोन परिस्थिती दिल्या जातात, ज्यांचा सामना त्यांना डॉक्टर किंवा नर्स म्हणून काम करताना वास्तविक जीवनात करावा लागू शकतो.
>
> **-अमित उपाध्याय**
> प्रादेशिक संचालक, दक्षिण आशिया, ओईटी

## OET परीक्षेची रचना काय आहे?

» ज्याप्रमाणे IELTS परीक्षेत एखाद्याच्या इंग्रजी प्रवीणतेचे मूल्यांकन करणारे चार विभाग असतात, त्याचप्रमाणे OET परीक्षा देखील आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या इंग्रजी प्रवीणतेचे चार विभागांमध्ये मूल्यांकन करते, जेणेकरून रुग्ण, त्यांचे कुटुंबीय आणि त्यांचे सहकारी यांच्याशी संवाद साधण्याच्या त्यांच्या क्षमतेचे मूल्यांकन करता येईल. OET मध्ये चार विभाग आहेतः

» श्रवण : सल्लामसलत, आरोग्यविषयक चर्चासत्रे आणि रुग्णालयातील माहिती सत्रांचे ऑडिओ रेकॉर्डिंग.

» वाचन : आरोग्यसेवेशी संबंधित मजकूर, जसे की क्लिनिकल केस स्टडीज आणि वैद्यकीय अहवाल.

» लेखन : आपल्या व्यवसायाशी संबंधित केस नोट्सच्या आधारे रेफरल, ट्रान्सफर किंवा डिस्चार्ज पत्र लिहिणे.

» भाषण : आपल्या व्यवसायाशी संबंधित भूमिका-अभिनय (उदा. एक नर्स रुग्णाला उपचार योजना समजावून सांगत आहे).

» श्रवण विभाग ४५ मिनिटांचा असतो. वाचन विभाग ६० मिनिटांचा असतो. त्याचप्रमाणे, लेखन विभाग ४५ मिनिटांचा आणि संभाषण विभाग २० मिनिटांचा असतो. गुणांकन 'ए' ते 'ई' पर्यंत असते. बहुतेक वैद्यकीय मंडळे आणि नर्सिंग परिषदा किमान 'बी' श्रेणी स्वीकारतात.

---

# बिझनेस

# 1 वर्ष, 3 वर्ष, की 5 वर्ष? कोणती मुदत ठेव देते सर्वाधिक परतावा...

**सुरक्षित परतावा आणि आर्थिक सुरक्षा शोधणाऱ्या पारंपरिक गुंतवणूकदारांसाठी भारतात मुदत ठेवी (एफडी) हा सर्वात पसंतीच्या गुंतवणूक पर्यायांपैकी एक आहे. तथापि, वेगवेगळ्या बँकांद्वारे दिले जाणारे वेगवेगळे व्याजदर आणि कालावधी पाहता गुंतवणूकदारांसमोर अनेकदा एक महत्त्वाचा प्रश्न असतो: त्यांनी कोणती एफडी निवडावी: १ वर्ष, ३ वर्षे, की ५ वर्षे? योग्य उत्तर केवळ व्याजदरांवरच नाही, तर तुमच्या आर्थिक गरजा, कर बचत आणि भविष्यातील व्याजदरातील चढ- उतारांच्या शक्यतांवरही अवलंबून असते.**

## 1 वर्षाची मुदत ठेव (FD)



» ज्या गुंतवणूकदारांना आपले पैसे दीर्घ कालावधीसाठी अडकवून ठेवायचे नाहीत आणि व्याजदर बदलल्यावर पुन्हा गुंतवणूक करण्याचे स्वातंत्र्य हवे आहे, त्यांच्यासाठी १ वर्षाची मुदत ठेव सर्वोत्तम आहे.

» स्मॉल फायनान्स बँकांमध्ये सूर्योदय स्मॉल फायनान्स बँक आणि उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक सध्या १ वर्षाच्या मुदतीसाठी ७.२५% आणि इक्विटास स्मॉल फायनान्स बँक ७.१०% व्याजदर देत आहेत.

» खासगी बँका येस बँक, आयसीआयसीआय बँक आणि एचडीएफसी बँक अनुक्रमे ६.६५%, ६.२५% आणि ६.५०% व्याजदर देत आहेत.

» सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) ६.२५% आणि बँक ऑफ इंडिया ६.५०% व्याजदर देत आहे.

## 3 वर्षांची एफडी

» ज्यांना दीर्घकालीन जोखीम न घेता जास्त परतावा मिळवायचा आहे, त्यांच्यासाठी तीन वर्षांची एफडी सर्वोत्तम आहे. अनेक बँका या कालावधीसाठी उत्कृष्ट व्याजदर देत आहेत.

» स्मॉल फायनान्स बँकांमध्ये जना स्मॉल फायनान्स बँक, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक आणि शिवालिक स्मॉल फायनान्स बँक ३ वर्षांच्या एफडीवर ७.५०% चा चांगला व्याजदर देत आहेत.

» खासगी बँकांमध्ये एचडीएफसी आणि आयसीआयसीआय बँक ६.४५% व्याजदर देत आहेत. आयडीएफसी फर्स्ट बँक ७.३५% दराने व्याज देत आहे.

» सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये एसबीआय ६.३०% व्याजदर देत आहे. पोस्ट ऑफिस ७.१०% व्याजदर देत आहे.

## 5 वर्षांची एफडी

» ज्या गुंतवणूकदारांची आर्थिक उद्दिष्ट्ये दीर्घकालीन आहेत किंवा ज्यांना आयकर कायद्याच्या कलम ८०सी अंतर्गत कर सवलतीचा दावा करायचा आहे, त्यांच्यासाठी पाच वर्षांची एफडी सर्वोत्तम आहे. ५ वर्षांच्या एफडीमध्ये गुंतवणूक करून तुम्ही वार्षिक १.५ लाख रुपयांपर्यंतच्या कर सवलतीचा दावा करू शकता.

» काही स्मॉल फायनान्स बँका ५ वर्षांच्या मुदतीसाठी त्यांचे सर्वोत्तम व्याजदर देत आहेत. सूर्योदय स्मॉल फायनान्स बँक ७.९०%, जना स्मॉल फायनान्स बँक ७.७७% आणि डीसीबी बँक ७.५०% व्याजदर देत आहे.

» आयसीआयसीआय बँकेसारख्या मोठ्या खासगी बँका ६.५०% आणि एचडीएफसी बँक ६.४०% व्याजदर देत आहेत.



» सार्वजनिक क्षेत्रातील बँका कमी व्याजदर देतात. एसबीआय ६.०५%, बँक ऑफ इंडिया ६% आणि पंजाब नॅशनल बँक ५ वर्षांच्या एफडीवर ५.९५% व्याजदर देत आहे.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी जास्त दर

हे व्याजदर सामान्य नागरिकांसाठी आहेत. सर्व बँका ज्येष्ठ नागरिक आणि सुपर सिटिझन्ससाठी जास्त व्याजदर देतात. ज्यांना त्वरित पैशांची गरज भासू शकते त्यांच्यासाठी १ वर्षाची एफडी सर्वोत्तम आहे. ज्यांना जास्त वेळ वाट न पाहता उत्कृष्ट व्याज मिळवायचे आहे त्यांच्यासाठी ३ वर्षांची एफडी आदर्श आहे. याउलट ज्यांना भविष्यासाठी सुरक्षित परतावा आणि कर बचत हवी असते, त्यांच्यासाठी ५ वर्षांची एफडी अधिक चांगली आहे.

---

## कॉलेज अर्धवट सोडलेल्या तरुणाने गाजवले कर्तृत्व!

# 10 हजारांच्या उत्पादनापासून उभारली 1 कोटीची कंपनी!

**सुफियान मुल्ला हे मुंबईचे रहिवासी आहेत. त्यांनी 'सायफर वॉचेस'(Cypher Watches) नावाचा यशस्वी व्यवसाय उभारला आहे. ही कंपनी १० हजार रुपयांच्या बजेटमध्ये प्रीमियम, यूनिक आणि कॉन्सेप्ट बेस्ड लक्झरी घड्याळे विकते. या तरुण उद्योजकाने घड्याळांबद्दलच्या आपल्या तीव्र आवडीमुळे या उद्योगात स्वतःचे नाव कमावले आहे. त्याने केवळ एका वर्षात १ कोटींहून अधिक रिव्हेन्यू मिळवला. सुफियानच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**




सुफियानला लहानपणापासूनच घड्याळांची आवड होती. कॉम्प्युटर सायन्सचे शिक्षण घेत असताना काहीतरी वेगळे करण्यासाठी त्याने कॉलेज सोडले. सुफियान म्हणाला, की माझ्या पालकांचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता. त्यांनी माझ्या निर्णयाला विरोध केला नाही.

» उणीव ओळखली... : सुफियानने कॉलेजमध्ये असतानाच 'वॉच फ्लिपिंग' (दुर्मिळ, उत्पादन बंद झालेली घड्याळे विकत घेऊन ती नफ्यात विकणे) सुरू केले. या अनौपचारिक व्यवसायातून त्याला केवळ चांगले उत्पन्नच मिळाले नाही, तर एक चांगला पैसाही मिळाला. पण, त्याला भारतीय घड्याळांच्या बाजारपेठेत एक उणीव जाणवली: बहुतेक ब्रँड्स स्विस डिझाइनची नक्कल करून ग्राहकांकडून जास्त पैसे आकारत होते. ही उणीव भरून काढण्यासाठी त्याने स्वतःचा एक प्रमाणित भारतीय ब्रँड तयार करण्याचा निर्णय घेतला.

» ब्रँड कसा सुरू केला... : सुफियानने २०२५ मध्ये आपल्या आई- वडिलांच्या पाठिंब्याने आणि स्वतःच्या बचतीतून 'सायफर वॉचेस' (Cipher Watches) लॉंच केले. सुरुवातीला तो उत्पादनापूर्वी ३डी मॉडेल्स आणि डिझाइन्सवर काम करत असे आणि आपल्या या प्रवासाचे पडद्यामागील फुटेज सोशल मीडिया व व्हॉट्सॲप ग्रुप्सवर घड्याळप्रेमींसोबत शेअर करत असे. तथापि, या प्रवासात त्याला उत्पादनाशी संबंधित अनेक आव्हानांचा सामना करावा लागला, जसे की विक्रेत्यांकडून डिझाइन लीक होण्याची भीती आणि किमान ऑर्डर संख्येची (MOQ) अट. या समस्यांवर उपाय म्हणून त्याने डिझाइन आणि असेम्बल इन इंडिया (Designed and Assembled in India) हे धोरण स्वीकारले. घड्याळे कंपनीमध्येच असेम्बल केली जातात, तर काही प्रीमियम घटक जपानसारख्या देशांमधून मागवले जातात.

» ऑर्डर्स जलद गतीने मिळवणे... : 'सायफर' (Cipher) हे नाव शून्याच्या मूळ शब्दावरून, म्हणजेच 'सिफर' (Cipher) वरून आले आहे. हे दर्शवते की एक विलक्षण निर्मिती शून्यातून कशी सुरू होते. या ब्रँडच्या घड्याळांचे एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक ग्राहकाला आपल्या आवडीचा सिरीयल नंबर केसबॅकवर कोरून घेण्याची संधी मिळते. याची नोंद वेबसाइटच्या सार्वजनिक नोंदणीमध्ये केली जाते. ब्रँडचा पहिला संग्रह, जो केवळ १०० घड्याळांची मर्यादित आवृत्ती होती, अधिकृत लॉन्चच्या अवघ्या सात दिवस आधीच विकला गेला. त्यानंतर, प्रचंड मागणीमुळे ब्रँडला १,००० हून अधिक घड्याळांची दुसरी बॅच लॉन्च करावी लागली.

» १ कोटींची कमाई : सध्या, हा ब्रँड पूर्णपणे ऑनलाइन कार्यरत आहे. या प्रीमियम भारतीय मायक्रोब्रँडने देशभरातील १,५०० हून अधिक ग्राहकांना सेवा दिली आहे. १०,००० रुपयांच्या सरासरी ऑर्डर मूल्यासह ब्रँडने आपल्या पहिल्याच वर्षात १ कोटी रुपयांहून अधिक महसूल मिळवला आहे. सुफियानला आशा आहे की पुढील वर्षापर्यंत त्यांच्या ब्रँडची विक्री ५ कोटींचा टप्पा ओलांडेल. उत्कृष्ट कारागिरी आणि परवडणाऱ्या किमतींसाठी जगभरात ओळखला जाणारा एक मजबूत भारतीय घड्याळ ब्रँड तयार करणे हे त्यांचे अंतिम ध्येय आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनी राज्यपालांचा योगाभ्यास; प्रशिक्षित योग शिक्षक घडवण्याचे आवाहन



**मुंबई (प्रतिनिधी)**– आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी शनिवारी महाराष्ट्र लोकभवन येथे भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांसह योगसत्रात सहभाग घेतला. यंदाचा योग दिन कार्यक्रम भारतीय तटरक्षक दलाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. विशेष म्हणजे, भारतीय तटरक्षक दल यावर्षी आपल्या सुवर्णमहोत्सवी वर्षात प्रवेश करत आहे. या योगसत्राला तटरक्षक दलाचे अधिकारी, त्यांचे कुटुंबीय तसेच महाराष्ट्र लोकभवनातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राज्यपालांनी राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांनी योगाचा व्यापक प्रचार-प्रसार करावा तसेच जगासाठी दर्जेदार योग शिक्षक आणि प्रशिक्षक घडवावेत, असे आवाहन केले.

योगाला आज जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याचे नमूद करताना राज्यपाल म्हणाले की, पूर्वी योगाचा अभ्यास प्रामुख्याने घरे, आश्रम आणि योग संस्थांपुरता मर्यादित होता. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव मांडल्यानंतर आज १५० हून अधिक देशांमध्ये हा दिवस उत्साहात साजरा केला जात आहे.

यावेळी राज्यपालांनी भारतीय तटरक्षक दलाच्या कार्याचेही कौतुक केले. १९७७ मध्ये स्थापन झाल्यापासून तटरक्षक दल राष्ट्रसेवेत महत्त्वपूर्ण योगदान देत असून आज ते भारताच्या सागरी सुरक्षा व्यवस्थेचा भक्कम आधारस्तंभ बनले आहे, असे त्यांनी नमूद केले.

समुद्रातील जीविताचे संरक्षण, मच्छीमारांची सुरक्षा, बेकायदेशीर कारवायांवर नियंत्रण तसेच किनारपट्टी सुरक्षेची जबाबदारी तटरक्षक दलाने प्रभावीपणे पार पाडली आहे. कठीण परिस्थितीतही अधिकारी आणि जवान अथक परिश्रम करून देशाचे समुद्र सुरक्षित आणि संरक्षित ठेवत आहेत, असे राज्यपाल म्हणाले.

राज्यातील २९ विद्यापीठांचे कुलपती म्हणून आपण विद्यापीठांना योग क्षेत्रात उत्कृष्ट प्रशिक्षक घडविण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास भारतीय तटरक्षक दलाच्या पश्चिम सागरी प्रदेशाचे अतिरिक्त महासंचालक एम. व्ही. पाठक तसेच महानिरीक्षक भीष्म शर्मा उपस्थित होते. यावेळी त्यांनी राज्यपालांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. कैवल्यधामचे योग प्रशिक्षक दिलीप दौनेरिया यांनी योग व प्राणायाम सत्राचे मार्गदर्शन केले.

# १ जुलैपासून रेल्वेच्या नियमांमध्ये बदल होणार?



**मुंबई (प्रतिनिधी)** – १ जुलैपासून रेल्वेचे नियम बदलू शकतात. तिकीटशिवाय प्रवास करणे, महिलांच्या राखीव डब्यात प्रवेश करणे आणि गोंधळ घातल्यास मोठा दंड आकारला जाईल. रेल्वे लवकरच नवीन दंडाचे नियम लागू करण्याची शक्यता आहे. तिकीटशिवाय प्रवास करणे, दुसऱ्याच्या तिकिटावर प्रवास करणे, महिलांसाठी राखीव डब्यात प्रवेश करणे, गोंधळ घालणे आणि धोकादायक वस्तू वाहून नेल्यास पूर्वीपेक्षा जास्त दंड आकारला जाऊ शकतो.

वैध रेल्वे तिकीटाशिवाय प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लवकरच पूर्वीपेक्षा जास्त दंड भरावा लागू शकतो. केंद्र सरकारने सार्वजनिक विश्वस्त निधी (सुधारणा तरतुदी) अधिनियम, २०२६ अंतर्गत अनेक बदल प्रस्तावित केले आहेत. यामध्ये तिकीटाशिवाय प्रवास केल्याबद्दलचा किमान दंड २५० रुपयांवरून ५०० रुपयांपर्यंत वाढवण्याचा समावेश आहे. रेल्वे बोर्डाने सर्व विभागीय रेल्वेला कळवले आहे की, या कायद्याला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे. रेल्वे कायदा, १९८९ मधील या सुधारणा एका स्वतंत्र अधिसूचनेद्वारे लागू केल्या जातील आणि त्या १ जुलैपासून अंमलात येण्याची शक्यता आहे.

**तिकिटाशिवाय प्रवास केल्यास दंड दुप्पट**

सुधारित कलम १३७ नुसार, तिकिटाशिवाय प्रवास करताना किंवा पूर्वी वापरलेली तिकिटे वापरताना पकडलेल्या प्रवाशांना तिकिटाचे भाडे आणि अतिरिक्त शुल्क दोन्ही भरावे लागेल. किमान दंड २५० वरून ५०० पर्यंत वाढवला जाईल. विहित शुल्क भरण्यात अयशस्वी झाल्यास त्यांच्यावर सक्षम न्यायालयात कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

नवीन प्रस्तावित नियमांनुसार, दुसऱ्याच्या नावाने जारी केलेले तिकिट वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. अशा प्रकरणांमध्ये, तिकीट जप्त केले जाऊ शकते. प्रवाशांना भाडे आणि अतिरिक्त शुल्क देखील भरावे लागेल, ज्याची किमान रक्कम ५०० असेल. यामुळे आरक्षित तिकिटांचा गैरवापर रोखला जाईल, असा रेल्वेचा विश्वास आहे.

**फेरीवाले आणि भिकारी यांच्यावर कठोर कारवाई**

रेल्वेच्या आवारात आणि गाड्यांमध्ये परवानगीशिवाय वस्तू विकणाऱ्या किंवा भीक मागणाऱ्यांवरही कठोर कारवाई प्रस्तावित आहे. अशा व्यक्तींना २००० पर्यंत दंड होऊ शकतो. वारंवार गुन्हा करणाऱ्यांना एक वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. गाड्यांमध्ये आणि रेल्वे स्थानकांवर भीक मागण्यास बंदी असेल.

प्रवासादरम्यान अपमानास्पद भाषा वापरणे, रेल्वेच्या सुविधांमध्ये अडथळा आणणे किंवा इतर प्रवाशांना त्रास देणे यासाठी १००० पर्यंत दंड होऊ शकतो. नशेत असताना गोंधळ घालणाऱ्या प्रवाशांना ट्रेन किंवा स्टेशनवरून उतरवले जाऊ शकते आणि त्यांच्यावर अतिरिक्त कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

महिलांसाठी राखीव असलेल्या जागा, बर्थ किंवा डब्यांमध्ये बसलेल्या पुरुष प्रवाशांना २५०० पर्यंत दंड होऊ शकतो. रेल्वे अधिकाऱ्यांना अशा प्रवाशांना तात्काळ बाहेर काढण्याचा अधिकारही असेल.

ट्रेनमध्ये प्रतिबंधित किंवा धोकादायक वस्तू बाळगल्यास किमान १०००० दंड आकारला जाऊ शकतो. प्रवासी भागात अतिक्रमण करणाऱ्यांना ५०० दंड आकारला जाईल. अशा लोकांना बाहेर काढण्यासाठी रेल्वे कर्मचाऱ्यांना अधिक अधिकारही दिले जातील.

**सरकार दंड का वाढवत आहे?**

सरकारचे म्हणणे आहे की, सार्वजनिक विश्वस्त कायदा, २०२६ चा उद्देश किरकोळ गुन्ह्यांसाठी फौजदारी कारवाईऐवजी आर्थिक दंडाची तरतूद करणे आणि कायद्याचे अधिक चांगले पालन सुनिश्चित करणे हा आहे. याअंतर्गत, दर तीन वर्षांनी दंडात १० टक्के वाढ करण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

# पंढरपूर मंदिरातील लेपन प्रक्रियेवरील स्थगिती अर्ज न्यायालयाने नाकारला

**सोलापूर (प्रतिनिधी)**–श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींवर भारतीय पुरातत्त्व विभागाच्या सल्ल्यानुसार करण्यात येणाऱ्या लेपन प्रक्रियेला स्थगिती द्यावी, अशी मागणी करणारी याचिका जिल्हा न्यायालयाने फेटाळून लावली आहे. ही याचिका भीमाचार्य बाळाचार्य वरखेडकर यांनी दाखल केली होती.

पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकासासाठी ३ हजार ९९३.९० कोटींच्या आराखड्याला मंजुरी

दोन दिवसांपूर्वी झालेल्या सुनावणीनंतर न्यायालयाने स्थगिती अर्ज नामंजूर केला. दरम्यान, मंदिर महासंघाचे गणेश लंके यांनी दाखल केलेल्या स्वतंत्र अर्जावर लवकरच न्यायालय निर्णय देणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. मंदिर समितीनुसार स्वयंभू विठ्ठल-रुक्मिणी मूर्तींची झीज होत असल्याने त्यांचे जतन आणि संवर्धन करण्याचा सल्ला भारतीय पुरातत्त्व विभागाने दिला आहे. त्यानुसार २२ ते २४ जून या कालावधीत पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली मूर्तींवर लेपन प्रक्रिया करण्यात येणार आहे. या कामासाठी २२ आणि २३ जून या दोन दिवसांत मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार असून, संवर्धन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नियमित दर्शन व्यवस्था पुन्हा सुरू करण्यात येणार आहे.

# सी-फुड निर्यात कारखान्यात अमोनिया वायूची गळती; अवघ्या पंचविशीतील ७ महिलांचा तडफडून मृत्यू



**चैनई (प्रतिनिधी)** – तामिळनाडूच्या तिरुवल्लूर जिल्ह्यातील एका सी-फुड निर्यात कारखान्यात अमोनिया वायूची गळती झाली. पीटीआयच्या वृत्तानुसार, या दुर्घटनेत सात महिला कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला, तर ६५ हून अधिक जण जखमी झाले. जखमींपैकी नऊ जण व्हेंटिलेटरवर आहेत. ही वायू गळती सेंट पीटर्स पॉल सी-फुड्स एक्सपोर्ट्स युनिटमध्ये झाली. या घटनेची माहिती मिळताच, अराक्कोनम येथील एनडीआरएफच्या चौथ्या बटालियनच्या मुख्यालयातून ३० सदस्यीय एनडीआरएफ पथक घटनास्थळी रवाना करण्यात आले.

जिल्हाधिकारी एस. कविता यांनी सांगितले की, ४६ रुग्णांना वेल्स रुग्णालयात आणि २१ रुग्णांना व्यंकटेश्वरा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गंभीर अवस्थेतील नऊ रुग्णांना चांगल्या उपचारांसाठी रुग्णवाहिकेने चेन्नई येथील शासकीय स्टॅनले मेडिकल कॉलेज रुग्णालयात नेण्यात आले. बळी पडलेल्यांपैकी बहुतेक २४ ते २५ वयोगटातील तरुण महिला होत्या. रुग्णांच्या नाडी आणि रक्तदाबावर लक्ष ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले. अनेकांचा रक्तदाब कमी असला तरी, त्यांचे तरुण वय पाहता त्यांच्या प्रकृतीत सुधारणा अपेक्षित होती.

अमोनिया हा अत्यंत तीव्र वास असलेला, रंगहीन आणि विषारी वायू आहे. रासायनिक खते, कोल्ड स्टोरेज (शीतगृहे), आणि विविध उद्योगांमध्ये याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. अमोनिया वायू हवेपेक्षा हलका असला, तरी त्याची गळती मानवी आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी अत्यंत घातक ठरू शकते.

अमोनिया वायूचा सर्वात मोठा धोका म्हणजे त्याचा शरीरातील ओलाव्याशी (पाण्याशी) होणारा जलद संपर्क. जेव्हा अमोनिया वायू डोळे, त्वचा, तोंड किंवा फुफ्फुसातील पाण्याच्या संपर्कात येतो, तेव्हा रासायनिक प्रक्रिया होऊन अत्यंत दाहक अमोनियम हायड्रॉक्साइड तयार होते. अमोनिया गळतीचे शरीरावर होणारे परिणाम हे हवेतील अमोनियाचे प्रमाण आणि व्यक्ती किती वेळ त्या संपर्कात राहिली आहे यावर अवलंबून असतात.


## :: जाहीर प्रगटन ::

माझे पक्षकार **प्रमोद पंडीतराव पतंगे रा. कमलाईनगर हदगांव ता. हदगांव जि.नांदेड, मो. ९४२२८७४२१४** यांनी दिलेल्या अधिकारावरुन व माहीती वरुन सर्व जनतेस ह्या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौ. आंबाळा ता. हदगांव जि.नांदेड येथील शेत सर्वे नं. 30/ड/4 क्षे. 0 हे. 61 आर ऐवढी जमीन मालक **प्रविण धोंडीराम जांभळे** यांच्याकडुन, तसेच सदर गट क्रमांकामधील 0 हे. 40 आर पो.ख.04 आर ऐवढी जमीन मालक **धोंडीराव केरबाराव जांभळे** यांच्याकडुन अशी एकुण 1 हे. 03 आर पो.ख.04 आर जमीन ज्याच्या एकत्रीत चतुःसिमा **पुर्वेस** -साहेबराव मेटकर यांची जमीन, **पश्चिमेस-** शिव रस्ता, **दक्षीणेस-** बळीराम देवला राठोड यांची जमीन, व **उत्तरेस** - संदिप पवार यांची जमीन ह्या चतुः सिमे आतील जमीन विकत घेण्याचा करार **दिनांक 15/06/2026** रोजी केलेला असुन त्या बाबतची सौदाचिठ्ठी माझ्या पक्षकाराच्या हक्कात जमीन मालक **प्रविण धोंडीबाराव जांभळे व धोंडीराम केरबाराव जांभळे** यांनी नोंदवुन दिले आहे व करारा नुसार सदर जमीनीचे खरेदीखत **दि.01/07/2026** रोजी करुन घ्यावयाचे ठरले आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ताबा, देणगी, इजमेंट किंवा ईतर कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसांच्या आत आपल्या हक्काबाबत असलेल्या कागदपत्रासह प्रत्यक्ष भेटुन लेखी माहिती कळवावी. परंतु सात दिवसांची मुदत संपल्या नंतर आपल्या हक्काबाबत न कळविल्यास कोणाचीही कसलीही तक्रार नाही असे समजुन खरेदीखत पुर्ण केले जाईल व त्या नंतर कोणाचीही कसलीही तक्रार विचारात घेतल्या जाणार नाही करीता ही जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

स्थळ :-हदगांव

दिनांक :20/06/2026

मार्फत

**ॲड. दीपक आर. पवार**

सह्याद्री निवास, अयोध्यानगर

हदगांव, **मो.नं. 8208037127**

**जाहीर प्रगटन देणार**

**प्रमोद पंडीतराव पतंगे**

**रा. कमलाईनगर हदगांव**

**ता. हदगांव जि.नांदेड,**

**मो. ९४२२८७४२१४**


# उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदेंनी दोन पावले मागे यावे, शिवसेना एकच व्हावी; 'ऑपरेशन टायगर'च्या घडामोडीत बच्चू कडूंच्या वक्तव्याने भुवया उंचावल्या



**मुंबई (प्रतिनिधी)** –महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे गटातील ६ खासदारांच्या बंडाच्या आणि 'ऑपरेशन टायगर'च्या सर्वत्र चर्चा सुरू असताना, शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषदेचे आमदार बच्चू कडू यांनी दोन्ही शिवसेना पुन्हा एकत्र याव्यात, अशी जाहीर इच्छा व्यक्त केली आहे. काहीही असो, शिवसेना महत्त्वाची आहे, असे म्हणत त्यांनी दोन्ही नेत्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संघटनेच्या अधिवेशनासाठी शनिवारी आले असता, पत्रकारांशी बोलताना त्यांनी आपले मत मांडले.

बच्चू कडू म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी दोन पावले मागे यावे आणि एकनाथ शिंदे यांनी देखील दोन पावले मागे यावे. दोन्हीही शिवसेना मिळून एकच शिवसेना व्हावी. काहीही असो, शिवसेना महत्तवाची आहे. त्यामुळे त्या दोघांनी एकत्र आले पाहिजे अशी माझी भावना आहे, असे माझे वैयक्तिक मत आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

बच्चू कडू पुढे म्हणाले की, ऑपरेशन टायगरबद्दल आपल्याला काही माहिती नव्हती, ते ऑपरेशन पूर्णपणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. आता अशी स्थिती आहे की, केवळ आमदार, खासदारच नव्हे तर कार्यकर्ते देखील एकनाथ शिंदे यांच्यासोबत येत आहेत. पक्षातून फुटणाऱ्यांना बदनाम का करता? फुटीची जबाबदारी सर्वांनी घेतली पाहिजे. वारंवार असे का होत आहे? याचा विचार करुन पक्ष नेतृत्त्वाबद्दल विचारले पाहिजे, असे देखील त्यांनी म्हटले.

ठाकरे गटाकडून सातत्याने होणाऱ्या 'खोके' किंवा आर्थिक व्यवहारांच्या आरोपांवर बच्चू कडू म्हणाले की, आपल्यातून बाहेर गेलेल्यांनी पैसे घेतले असे म्हणणे योग्य नाही. आपल्या सोबत इतका काळ असणाऱ्यांना असा डाग देणे, दोष देणे चुकीचे आहे, असे त्यांनी म्हटले.

तसेच, सध्याची स्थिती अशी आहे की, आता फक्त एकच शिवसेना आहे आणि ती देखील एकनाथ शिंदे यांचीच आहे. शिवसेना आता २०२९ साली होणाऱ्या निवडणुकीची तयारी करीत आहे. २०२९ चे पर्व शिवसेनेचेच असणार आहे, असा विश्वास देखील बच्चू कडू यांनी व्यक्त केला.

# पोलीस बंदोबस्तात पार पडली 'नीट' परीक्षा; दोन मिनिटांच्या उशिराने विद्यार्थ्यांचे वर्ष वाया

**मुंबई (प्रतिनिधी)**– अवघ्या दोन मिनिटे उशिराने परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्याला परीक्षेकरिता प्रवेश नाकारला. त्यामुळे त्या विद्यार्थ्याचे वर्ष वाया गेले असून, पोलीस बंदोबस्तात नीट परीक्षा घेण्यात आल्या.

देशभरात पेपरफुटीनंतर होत असलेल्या नीट यूजी २०२६ च्या परीक्षेसाठी रविवारी देशभरात एनटीएनने मोठी तयारी केल्याचं दिसून आलं. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सर्वच परीक्षा केंद्रांवर पोलिसांचा तगडा बंदोबस्त लागला होता. लातूर पॅटर्नमुळे देशभरात गाजलेल्या लातूर जिल्हा प्रशासनानेही नीट परीक्षेची सर्व तयारी केली होती. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत पार पडावी यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तर एनटीएकडून देण्यात आलेल्या नियमांचेही काटेकोरपणे पालन करण्यात येत होते. एनटीएच्या याच नियमांचा फटका दोन विद्यार्थ्यांना बसला असून, केवळ दोन मिनिटे उशीर झाल्याने मुंबईतील दोन विद्यार्थ्यांना परत फिरावे लागले.

मुंबईतील परळ भागातील महर्षी दयानंद कॉलेज हे यंदाच्या पुनर्परीक्षा घेण्यात येत असलेल्या NEET पेपरचे केंद्र आहे. या ठिकाणी दोन विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी अवघे दोन मिनिटे उशीर झाल्याने त्यांचे अक्षरश: वर्ष वाया गेलं आहे. परीक्षा केंद्रावर केवळ २ मिनेट उशिरा पोहचल्याने दोन विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता आले नाही, त्यामुळे परीक्षा केंद्रावर मोठा गोंधळ झाला. यावेळी, परीक्षार्थी उमेदवारांची घालमेल पाहून इतर विद्यार्थांच्या पालकांनी देखील संबंधित दोन विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आता घ्यावे म्हणून प्रशासनाकडे विनंती केली. मात्र, एनटी अधिकाऱ्यांनी नियमांच्या पुढे जात येत नाही, असे म्हणत दोन्ही विद्यार्थ्यांना प्रवेशास मनाई केली. त्यामुळे, या दोन्ही विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले होते.

# इंग्लंडमध्ये पुन्हा एकदा राजकीय भूकंप! दहा वर्षात पाचव्या पंतप्रधानांचा राजीनामा? स्वपक्षातील १०० हून अधिक खासदार विरोधात

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**–ब्रिटिश वृत्तपत्र 'द ऑब्झर्व्हर'मधील एका वृत्तानुसार, ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर सोमवारी आपल्या राजीनाम्याची घोषणा करतील आणि आपल्या पदत्यागाचा आराखडा सादर करतील अशी अपेक्षा आहे. मंत्रिमंडळातील मंत्री, सल्लागार आणि कामगार संघटनांच्या नेत्यांशी सल्लामसलत केल्यानंतर, आपला कार्यकाळ आता पुढे चालू ठेवणे अशक्य आहे, असा निर्णय स्टारमर यांनी घेतला आहे. तथापि, रॉयटर्सच्या वृत्तानुसार, सरकारी सूत्रांनी हा दावा फेटाळून लावला असून, स्टारमर अजूनही पंतप्रधान म्हणून आपल्या कामावर लक्ष केंद्रित करत असल्याचे म्हटले आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार, स्टारमर यांच्या लेबर पार्टीच्या १०० हून अधिक खासदारांनी जाहीरपणे म्हटले आहे की पंतप्रधानांनी राजीनामा द्यावा किंवा राजीनाम्यासाठी अंतिम मुदत जाहीर करावी. स्टारमर यांना विरोध करणारे हे खासदार हाऊस ऑफ कॉमन्समधील पक्षाच्या एकूण खासदारांपैकी जवळपास एक चतुर्थांश आहेत. जर स्टारमर यांनी राजीनामा दिला, तर ते ब्रिटनच्या १० वर्षांच्या इतिहासात राजीनामा देणारे सहावे पंतप्रधान ठरतील. यापूर्वी डेव्हिड कॅमेरॉन, थेरेसा मे, बोरिस जॉन्सन, लिझ ट्रस आणि ऋषी सुनक या सर्वांनी आपला कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला आहे.

स्टारमर यांनी २०२४ मध्ये लेबर पार्टीला निवडणुकीत प्रचंड विजय मिळवून दिला, परंतु तेव्हापासून त्यांची लोकप्रियता सातत्याने घसरत आहे. अनेक वाद, धोरणांमधील यू-टर्न आणि राहणीमान सुधारण्याची आश्वासने पूर्ण करण्यात आलेले अपयश यामुळे त्यांच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. शुक्रवारी झालेल्या पोटनिवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धी अँडी बर्नहॅम विजयी झाल्याने स्टारमर यांच्या अडचणी आणखी वाढल्या. या विजयामुळे बर्नहॅम पक्षाच्या नेतृत्वासाठी दावेदार बनू शकतात. आपल्या विजयानंतर बर्नहॅम यांनी म्हटले आहे की, त्यांना देशाला एक नवी दिशा द्यायची आहे. बर्नहॅम यांचे समर्थक स्टारमर यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. माजी आरोग्य मंत्री वेस स्ट्रीटिंग यांनीही गरज पडल्यास स्टारमर यांना नेतृत्वासाठी आव्हान देऊ शकतो, असे संकेत दिले आहेत. तथापि, स्टारमर यांनी १९ जून रोजी स्पष्टपणे सांगितले की, ते आपल्या नेतृत्वाला कोणत्याही आव्हानाचा सामना करतील. त्यांनी लेबर पार्टीच्या नेत्यांना पक्षांतर्गत भांडणे टाळण्याचे आवाहनही केले.


## Change In Name

**I, Prafulata Pandharinath Bokaare, resident of 91, Sahyognagar Nanded hereby declare that my name is recorded as "Prafulata Pandharinath Bokaare" in my Aadhaar Card and PAN Card, whereas my surname is mentioned as "Bokare" in my Passport bearing Passport No. K 5428315**

**I hereby declare that "Prafulata Pandharinath Bokaare" and "Prafulata Pandharinath Bokare" are one and the same person, i.e., myself. The variation in surname is due to a spelling difference only and does not indicate any change in identity. Henceforth, both names may be treated as referring to one and the same person.**

## Change In Name

My old name is **Purshottam RAMESH DHOBEKAR** Which now I am Changing as new Name **Purushottam RAMESH DHOBEKAR** . Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same. **Address-Gut No. 299, Plot No. 10, Radhakrishna Nagari Taroda Bk. Post-Taroda Bk. Dist. Nanded-431605**

**Mo. No. 9356799749**

## Change In Name

**I, Pandharinath Namdevrao Bokaare, resident of 91,Sahyognagar Nanded hereby declare that my name is recorded as "Pandharinath Namdevrao Bokaare" in my Aadhaar Card and PAN Card, whereas my surname is mentioned as "Bokare" in my Passport bearing Passport No. K 6321499**

**I hereby declare that "Pandharinath Namdevrao Bokaare" and "Pandharinath Namdevrao Bokare" are one and the same person, i.e., myself. The variation in surname is due to a spelling difference only and does not indicate any change in identity.**

**Henceforth, both names may be treated as referring to one and the same person.**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




१२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात संपन्न

## ‘करो योग रहो निरोग’ नियमीत योगा ही आरोग्यासाठी संजीवनी -शहाजी उमाप

**नांदेड (प्रतिनिधी) –** करो योग, रहो निरोग हा संदेश देत प्रत्येकाने नियमित योगा करावा, कारण योगा आरोग्यासाठी संजीवनी आहे, असे प्रतिपादन नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले.



रविवारी नांदेडमध्ये हर्षोल्हासित वातावरणात आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. यावेळी विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप बोलत होते.

योगा दिनाच्या निमित्ताने जगभरात योगासनाची परंपरा स्वीकारणे व ती अंगीकारणे, ही आपल्या देशासाठी अभिमानाची बाब आहे. कारण, योगा हा आपल्या भारतीय संस्कृतीच्या वारशाचा अविभाज्य घटक आहे. आयुष मंत्रालय, भारत सरकार, महाराष्ट्र शासन, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नांदेड, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, युवा अधिकारी माय भारत, लोकत समूह सखी मंच, योग विद्या धाम, पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिवींग या कार्यक्रम प्रसंगी जिल्हा योग संघटना, नांदेड, योग विद्येचा प्रसार करणाऱ्या स्थानिक संस्थांचे प्रतिनिधी व विविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जून, २०२६ रोजी सकाळी ७ वा. पोलीस कवायत मैदान, वजिराबाद नांदेड येथे १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रम प्रसंगी नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पचे डॉ. बी. सरवणन, नांदेडचे पोलीस उपअधीक्षक श्रीमती अश्विनी जगताप, युवा अधिकारी अस्नी कनकटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नांदेडचे राजकुमार मुक्कावार, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, सहा. आयुक्त, समाजकल्याण, नांदेडचे शिवानंद मिनगीरे, राजेश निस्ताने, रमेश तावडे, जयकुमार टेंभरे, रामचंद्र पाचंगे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांचे शिक्षणाधिकारी माधव सलगर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी मनोगत व्यक्त करताना नियमीत योगा ही आरोग्यासाठी संजीवनी आहे व सर्वांनी या योग दिनाच्या औचित्याने नियमीत योगा करुन आपले आरोग्य अबाधित राखावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

कल्लाळ, निमजी वाळू घाटावर पुन्हा नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

## एक कोटीची यंत्रसामुग्री जप्त, सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी) –**मागील आठवड्यात कल्लाळ, निमजी, पिंपळगाव, गंगाबेट या वाळूघाटावर पोलिसांनी संयुक्त कारवाई करून सव्वा तीन कोटींची यंत्रसामुग्री जप्त केल्यानंतर पुन्हा याच वाळू घाटावर नांदेड ग्रामीण पोलिसांनी धडाकेबाज कारवाई केली. या कारवाईत जवळपास एक कोटीची यंत्रसामुग्री पुन्हा जप्त केली आहे. त्यातील काही इंजिन व बोटी ब्लास्ट करून उडवून दिल्या आहेत.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतूक करणारे लोकांवर कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

त्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर हे व वरील पोलीस अधिकारी, अंमलदार असे कल्लाळ टी पाईट व कल्लाळ, पिंपळगाव निमजी शिवारातील गोदावरी नदीपात्रात चोरुन लपून अवैध रेती उपसा होत आहे, अशा माहितीवरुन योग्य तो सापळा लावून दि. २० जून २०२६ रोजी चार वाजता कल्लाळ टी पाईट व कल्लाळ, पिंपळगाव निमजी शिवारातील गोदावरी नदी पात्रातून अवैध रेती उपसा करून हायवा व जे.सी.बीच्या साहयाने अवैध रेती वाहतूक व उपसा करणारे इसमावर छापा कारवाई करून २६ तराफे, ७ इंजीन, ५२ ब्रास रेती जप्त करून जागीच नाश केले. हायवा ट्रक पो. स्टे. ला लावला व ६ आरोपीतांविरोधात कलम ३०३(२), ३(५) भा. न्या. से, सहकलम ४८(७),४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ९,१५ पर्यावरण संरक्षण अधिनियम, कलम ३,७ सार्वजनिक संपती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गणेश नगर काळोखात : मनपाने लक्ष देण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी) –**अत्यंत उच्चभ्रू वस्तीचा व कायम गजबजलेला परिसर म्हणून ओळख असलेला गणेशनगर, विजयनगर व नांदेड हाउसिंग सोसायटी या भागातील मुख्य रस्त्यावरील स्ट्रीट लाईट मागील एक महिन्यापासून बंद आहेत. त्यामुळे या भागात काळोखाचे साम्राज्य पसरले आहे. महानगरपालिकेने त्वरित स्ट्रीट लाईट सुरू करण्याची मागणी येथील रहिवाशांनी केली आहे.

मागील एक महिन्यापासून फुले मार्केट ते पावडेवाडी नाका या रस्त्यावरील वाय पॉईंट ते पावडेवाडी नाका या रोडवरील स्ट्रीट लाईट बंद आहेत. एज्युकेशन-हब ही नांदेडची देशभर ओळख आहे. महाराष्ट्राच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातून असंख्य पालक नांदेडला आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी स्थलांतरित होत असतात. ट्युशन एरियापासून जवळ असल्यामुळे गणेशनगर व विजयनगर भागात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित विद्यार्थ्यांची वस्ती आहे. ट्युशन संपल्यानंतर रात्री घरी परतताना विद्यार्थ्यांना या गर्द काळोखाचा सामना करावा लागत आहे तर महाविद्यालयीन मुलींना अंधाराचा फायदा घेऊन टगेगिरी करणाऱ्या टवाळखोरांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने या रस्त्यावरील पथदिवे त्वरित सुरू करून गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सहकार्य करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

## आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रवीण जेठेवाड यांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी) –**आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या स्थापनेनंतर संघटनेचे पहिले राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल प्रवीण जेठेवाड यांचा विशेष सत्कार करण्यात आला.



या प्रसंगी आदिवासी मन्नेरवारलू महासंघाचे राष्ट्रीय सरचिटणीस संतोष वारकड, राष्ट्रीय चिटणीस राजेश्वर पालेपवाड, राष्ट्रीय खजिनदार गंगाधरराव रामोड तसेच राष्ट्रीय संचालक गणेश सुभानजोड उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण जेठेवाड यांनी सांगितले की, आदिवासी, दलित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या सर्वांगीण विकासासाठी ते आयुष्यभर कार्यरत राहतील. तसेच गरीब व होतकरू युवक-युवतींसाठी रोजगार, कौशल्य विकास आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महासंघामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतील.

यावेळी त्यांनी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून संघटित व सक्षम समाज निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त केला. समाजातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी महासंघ कटिबद्ध राहील, असे आश्वासन त्यांनी उपस्थित सदस्यांना दिले. कार्यक्रमात उपस्थित पदाधिकाऱ्यांनी प्रवीण जेठेवाड यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी मन्नेरवारलू समाजाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि समाजाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण जेठेवाड, उपाध्यक्ष रामरेड्डी आईटवार, सरचिटणीस संतोष वारकड, चिटणीस राजेश्वर पालेपवाड, कोषाध्यक्ष गंगाधरराव रामोड, राष्ट्रीय संचालक गणेश सुभानजोड, मुख्य कार्यकारी अधिकारी व राष्ट्रीय संचालक तुकाराम आडबलवार यांचा समावेश आहे.

इकडचं तिकडचं

## होऊ दे रे आबादानी..!!

इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया, सोशल मीडिया; या आठवड्यात जिकडे-तिकडे उबाठाचे खासदार फुटल्याचीच चर्चा. पूर्वी राजकारणावर मोजकीच माणसे भाष्य करायची. बाकी तमाम जनता आपण भले आणि आपले काम भले म्हणत राजकीय चर्चेपासून अलिप्त असायची. पण आता राजकारणानेच सर्वांचं विश्व व्यापलंय. एका हिंदी सिनेमातील डायलॉग आजच्या वातावरणाला फिट्ट बसतो. राजकारण जणू आपल्याला म्हणतंय की, मैं तुम्हे भूल जांऊ ये हो नहीं सकता और तुम मुझे भूल जाओ ये मैं होने नहीं दुंगा। राजनितीनं इतकं सगळ्यांना वेड लावलंय.

चौकाचौकांतील चर्चेत फुटाफुटीला गद्दारी म्हणणारे काहीजण असतात तर पक्षांतराचे समर्थन करणारेही सापडतात. निष्ठावंत की निसटावंत यावर इमान इकल्याले इमानात बसून दिल्लीला पळाले. अशा चविष्ट चर्चा झडतायत. पुढचा निर्णय कार्यकर्ते व मतदारसंघातील जनतेला विचारून घेणार या विधानावर अधिकांश लोकं प्रतिक्रिया देत आहेत की, आम्हाला न विचारता स्पेशल विमानात बसून दिल्ली वारी केली, तुमची ‘अर्थ’पूर्ण बोलणी आधीच झाली, मग आता जनतेला विचारण्याची ही नाटकं कशाला करताय? आम्हाला दुधखुळं का समजताय?

आज सकाळी काही शेतकरी काळेश्वर मंदिराबाहेर उभे होते. माझं सहजच त्यांच्या बोलण्याकडे लक्ष गेलं. त्यांची चर्चा ऐकल्यामुळे चर्चेमुळे संत गाडगेबाबांच्या कीर्तनातील गाजलेली ओळ मला आठवली, मह्या बापानं केला नाही पेरा, तर जग काय खाईल धत्तुरा?

केविलवाण्या चेहऱ्याने त्या घोळक्यातील एक शेतकरी प्रार्थना करत होता, पेपर फुटले, आमदार फुटले, खासदार फुटले, आता ढग फुटू दे रे पांडुरंगा।

हे दृष्य पाहून आजच्या लोकशाहीपेक्षाही हतबल व विमनस्क अवस्थेत मीही पुटपुटलो, होऊ दे रे आबादानी...

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

## गोपाळराव वरळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी) –** लोहा तालुक्यातील पळशी येथील ज्येष्ठ नागरिक गोपाळराव विठ्ठलराव वरळे पाटील यांचे रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर २१ जून रोजी सायंकाळी पळशी ता. लोहा येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ४ मुली, १ मुलगा, नातू, पंतू असा परिवार आहे. वसंतराव पाटील वरळे यांचे ते वडील होत.

## आंतरराष्ट्रीय योग दिनी योगसाधकांचा भरला मेळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर नित्ययोग सेवा समितीच्या वतीने आयटीआय येथे आयोजित दि. १९, २० व २१ असे तीन दिवसीय मोफत योग शिबिरास प्रतिसाद लाभला.



नित्य योग सेवा समिती आयोजित तीन दिवसीय योग शिबिराचे रोगमुक्तीसाठी आयोजन करण्यात आले. या संगीतमय योग शिबिरास प्रचंड प्रतिसाद मिळाला. तिन्ही दिवस सकाळी पाच ते सात या वेळेत योगाचार्य नांदेड योगरत्न भूषण सीताराम सोनटक्के गुरुजी यांनी प्राणायाम, विविध योगासने, ध्यान आराधना आयुर्वेद यावर परिपूर्ण अभ्यास घेतला.

आंतरराष्ट्रीय योग दिनी सचखंड गुरुद्वाराचे प्रमुख लंगर पुजारी बाबा बलविंदरसिंग यांच्या वतीने दीपप्रज्वलन करण्यात आले. या प्रसंगी योगपीठावर नांदेड उत्तर मतदारसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर, वसमत गुरुद्वाराचे माजी व्यवस्थापक हुकूमसिंग, एकनाथ महाराज, त्रिनेत्र महाराज (परळी वैजनाथ), गोभक्त बालकृष्ण महाराज राजस्थान, ब्रह्मकुमारीजच्या मुख्य बहेनजी स्वाती दीदी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सचिन सूर्यवंशी, उपप्राचार्य विश्वंभर कंदलवाड, दिनेश पोतदार, योगप्रेमी काजल नागडा, मराठी अभिनेत्री स्वामी समर्थ फेम माधुरीताई आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी आदर्शयोगशिक्षिका उज्ज्वलाताई जनकवाडे, सविताताई चव्हाण यांनी निरंतर दोन तास सूर्यनमस्कार अभ्यास केला. तर कु. सिद्धी कोकरे हिने भरतनाट्यम नृत्य सादर केले. प्रा. विलास गारोळे यांच्या संगीत संचाने सुमधुर गायनसेवा दिली तर सलग तीन दिवस यज्ञाची सेवा योगिनी लताताई यांनी दिली. अभिषेक कदम यांनी स्वतः ड्रोन बनवून आपल्या या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात ड्रोनची सेवा दिली. योगप्रेमी कृष्णा पावडे यांनी शंभराहून अधिक गुळवेलचे रोपटे योग शिबिरामध्ये वाटप केले.


पान १ वरून...


**वैभव सूर्यवंशीने दाखवले श्रीलंकन खेळाडुंना भरदिवसा तारे**

ती सोडली नाही. वैभव सूर्यवंशीने श्रीलंका ए विरुद्धच्या अंतिम सामन्यात अवघ्या ११ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. लिस्ट-ए क्रिकेटच्या इतिहासातील हा नवा जागतिक विक्रमठरला आहे. वैभवने आपल्या २९ चेंडूंच्या झंझावाती खेळीत ८ षटकार आणि १० चौकारांच्या मदतीने तब्बल ९४ धावा ठोकल्या. अंतिम सामन्यात ठोकलेल्या ८ षटकारांच्या जोरावर वैभव सूर्यवंशी या मालिकेत सर्वाधिक षटकार मारणारा फलंदाज ठरला. त्याने एकूण ११ षटकारांसह मालिकेचा शेवट केला.

## गोदावरी नदीपात्रातील तब्बल २ कोटी ९० लाखांच्या ११ फायबर आणि ३ इंजिन बोटी जिलेटिनने उद्ध्वस्त

**मुदखेड (प्रतिनिधी) –**मुदखेड तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरोधात मुदखेड पोलिसांनी आजपर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई केली आहे.



तालुक्यातील माळकौठा शिवारात चालू असलेल्या अवैध रेती उत्खनन करणाऱ्या ११ फायबर आणि ०३ इंजिन बोटी असा एकूण २ कोटी ९० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जागीच जिलेटिनच्या सहाय्याने ब्लास्ट करून नष्ट केला आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खनन व चोरट्या वाहतुकीविरोधात कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मुदखेडचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण हे पथकासह परिसरात पेट्रोलिंग करत खुजडा शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रात काहीजण फायबर व इंजिन बोटीच्या सहाय्याने अवैधरित्या वाळू उपसा करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ आपत्ती व्यवस्थापनाच्या बोटीद्वारे नदीपात्रात छापा टाकला. पोलिसांना पाहताच आरोपींनी बोटी नदीपात्रातच सोडल्या आणि पळ काढला. पोलिसांनी माळकौठा शिवारातील नदीपात्रातून ११ फायबर आणि ३ इंजिन बोटी जप्त केल्या. हा सर्व मुद्देमाल अत्यंत अवजड असल्याने तो नदीपात्राबाहेर काढणे अशक्य होते. त्यामुळे पर्यावरणाची आणि सुरक्षिततेची पूर्ण काळजी घेत, पोलिसांनी जिलेटिनच्या सहाय्याने हा २ कोटी ९० लाखांचा मुद्देमाल जागीच ब्लास्ट करून नष्ट केला.

या प्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ११६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) सह महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४७, ४८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये आरोपी गणेश पाटील उबाळे मारतळा, भरत ढगे - मालीपाटील मारतळा, कचरु जाधव उर्फ पप्पू मिस्त्री माळकौठा, कामाजी भरकडे रा. कौडगांव, माधव सोमवारे रा. येळी, ज्ञानेश्वर कळसे रा. वासरी, बबन खानसोळे रा. वासरी, इतर दोन अज्ञात आरोपी असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

ही धडक कारवाई नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक भोकर, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक नांदेड, सूरज गुरव, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेडचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण, पोलीस अंमलदार दिलीप चक्रधर यांनी केली.

## शॉर्टसर्किटमुळे ‘श्री मेडिकल’ आगीच्या भक्ष्यस्थानी

**नांदेड (प्रतिनिधी) –**शहरातील तरोडा नाका परिसरातील औषधी क्षेत्रातील नामांकित ‘श्री मेडिकल अँड जनरल स्टोअर्स’ला बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागून दुकान जळून खाक झाले. या आगीत दुकानमालकाचे लाखो रुपयांची औषधी, संगणक व इतर साहित्य भस्मसात झाले. वरच्या मजल्यावर वास्तव्यास असलेले कुटुंब पोलिसांच्या तातडीच्या मदतीने थोडक्यात बचावले.



बुधवार, २० जून रोजी रात्री १२.३० च्या सुमारास तरोडा नाका मुख्य बाजारपेठेतील श्री मेडिकलमध्ये अचानक शॉर्टसर्किट झाला आणि क्षणात आगीचे लोळ वर चढले. घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे कर्मचारी व नांदेड महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी तब्बल १ ते २ तास अथक मेहनत घेऊन आग आटोक्यात आणली. आगीचा विस्तार शेजारच्या दुकानांपर्यंत जाऊ दिला नाही. माजी केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन सदस्य सुरेश उत्तरवार हे गेल्या ४० वर्षांपासून औषधी व्यवसाय करत आहेत. आगीत त्यांचे लाखो रुपयांची औषधे पूर्णपणे जळून खाक झाली. कॉम्प्युटर, बिलिंग मशीन, फर्निचर, फ्रीज यांसारखे सर्व साहित्य जळाले. व्यवसायाची कागदपत्रे व रेकॉर्डही नष्ट झाले. ४० वर्षे कष्टाने उभे केलेले दुकान एका रात्रीत राख झाले. उदरनिर्वाहाचे साधन गेल्याने कुटुंबावर आभाळ कोसळले आहे, असे दुःख व्यक्त करताना उत्तरवार यांना अश्रू अनावर झाले.

शहरासह जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून महावितरणचा वीज लपंडाव सुरू आहे. कधी कमी व्होल्टेज, तर कधी अचानक व्होल्टेज वाढत आहे. यामुळे अनेकांच्या घरातील टीव्ही, फ्रीज, एसी जळत आहेत. आजही तरोडा नाका परिसरात रात्री व्होल्टेजचा फटका बसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. प्राथमिक अंदाजानुसार अचानक व्होल्टेज वाढून शॉर्टसर्किट झाला आणि त्यातूनच ही आग लागली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. अधिकृत कारण पंचनामा झाल्यानंतर स्पष्ट होईल.

स्थानिक केमिस्ट म्हणाले, आम्ही दरमहा हजारो रुपयांचे बील भरतो. मात्र वीजेची खात्री नाही. आता जीवापेक्षा मौल्यवान वस्तू जळू लागल्या आहेत. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी वेळेत धाव घेऊन कुटुंबाला बाहेर काढले व गर्दी नियंत्रणात ठेवली. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून शेजारील दुकाने वाचवली. त्यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली. घटनास्थळी जमलेल्या व्यापाऱ्यांनी महावितरणच्या कारभारावर संताप व्यक्त केला. जर व्होल्टेज चढ-उतारामुळे शॉर्टसर्किट झाला असेल तर महावितरणने उत्तरवार कुटुंबाला नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे. आग विझवताना शॉर्टसर्किट हेच प्राथमिक कारण असल्याचे अग्निशमन अधिकाऱ्यांनी सांगितले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com